सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन
संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ६
सप्टेंबर २०२३

स्वागतमूल्य
₹. 30/-




प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने

# श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

प्रतिवर्षाप्रमाणे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा शनिवार, दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदीरजवळ, श्री महालक्ष्मी मंदीर दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे आयोजित केला आहे. यामध्ये पूजा, महाप्रसाद, श्री देवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन सायंकाळी ७ नंतर घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास पूजेसाठी येणाऱ्या वशेळ्यांनी दि. १९ सप्टेंबर, २०२३ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याच्या प्रसादासाठी येणाऱ्या भक्तांनी दि. १९ सप्टेंबर २०२३ पूर्वी नोंदणी करावी. वशेळ्यांनी सकाळी ठीक ८ वाजता मंगलधाम सभागृहात येणेचे आहे. प्रसादाची वेळ दुपारी १२ ते ३ पर्यंतच आहे. भाविकांसाठी दर्शन वेळ सायंकाळी ७ ते रात्री ९ पर्यंतच ठेवली आहे. प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन प्रसंगानुरूप आवश्यक ते बदल होऊ शकतात. संबंधितांनी आधिक माहितीसाठी संघाच्या कार्यालयीन वेळेत ०२३१-२५४६२२५/२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५ या नंबरवर संपर्क करावा.

| **नंदकुमार मराठे** | **प्रसाद भिडे** |
|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष |

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मागील वर्षापासून नवीन उपक्रम सुरू केला आहे. अनेक भक्तांना केवळ प्रत्यक्ष दर्शन काही कारणांमुळे मिळत नाही. शिवाय आपले ज्ञाती बांधव केवळ भारतातच नाही, तर परदेशातही वास्तव्यास असतात. सर्व भक्तांना हा सोहळा घरी पाहता यावा यासाठी मागील वर्षापासून श्री अष्टमी सोहळ्याचे प्रक्षेपण सायंकाळी फेसबुकवरून लाईव्ह दाखविण्याची मोफत सोय केली आहे. संघाच्या फेसबुक पेजवरून हा सोहळा सर्व भक्तांना पाहता येणार आहे. जास्तीत जास्त भक्तांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात.

## घरपोच प्रसाद योजना

स्थानिक किंवा परगावी असणाऱ्या भक्तांना घरपोच प्रसाद पाठवण्याची व्यवस्था संघाने केली आहे. यासाठी अभिषेक व प्रसाद दक्षिणा केवळ रु. ३५१/- संघाच्या अधिकृत कार्यालयात किंवा संघाच्या पत्त्यावर मनिऑर्डर किंवा बँक ट्रान्स्फर/ गुगल पे यापैकी कोणत्याही माध्यमातून पाठवावेत. नोंदणी फॉर्म आपल्याला व्हॉटस् ॲपवर पाठवला जाईल. त्यासाठी आपला व्हॉटस् ॲप नंबर संस्थेच्या ७६२०५४६२२५ या नंबर वर कळवावा. आपला संपूर्ण पत्ता व व्हॉटस् ॲप नंबर कळवल्यास आपल्याला घरपोच श्रींचा प्रसाद पाठवणे सोयीचे होईल. जास्तीत जास्त भाविकांनी या 'घरपोच प्रसाद योजनेचा' लाभ घ्यावा.

आपले स्नेहांकित,

| **हृषिकेश लिमये** | **सौ. संगिता आपटे** | **संतोष साने** | **केदार जोशी** |
|---|---|---|---|
| (संचालक) | (खजानिस) | (सहकार्यवाह) | (कार्यवाह) |
| ९४०४२६०४७० | ८१४९४८००३४ | ८४५९०१९०९१ | ७५८८८३९५२७ |

# श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था मर्यादित

२६९७/अ, ए वॉर्ड, 'श्री परशुराम भवन', कोठीशाळा रोड,
महाद्वार रोड कार्नर, कोल्हापूर-४१६०१२. **पॅन क्र. AADAS0099R**

## अधिमंडळाच्या २६ व्या वार्षिक बैठकीची सूचना

(फक्त सभासदांकरीता)

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर या सहकारी संस्थेच्या अधिमंडळाची वार्षिक बैठक **रविवार, दिनांक १०/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. 'ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम' मंगळवार पेठ, कोल्हापूर** येथे संस्थचे अध्यक्ष मा. श्री. गिरीष अच्युत जोग यांचे अध्यक्षतेखाली पुढील विषयावर विचार विनिमय करणेसाठी बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### -: बैठकीपुढील विषय सूची :-

१. मागील सभा दि. २१/०८/२०२२ रोजीचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२२-२३ चा अहवाल, लेखापरिक्षण झालेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक यांना मंजुरी देणे.
३. सन २०२२-२३ सालच्या नफा विभागणीस संचालक मंडळाने मंजूर केलेल्या लाभांश मंजूरीची नोंद घेणे.
४. सन २०२२-२३ च्या खर्चाच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी व २०२३-२४ साठी संचालक मंडळाने शिफारस केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२२-२३ सालच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
६. सन २०२३-२४ सालाकरीता संचालक मंडळाने नेमलेल्या शासकीय लेखापरिक्षकाची नोंद घेणे.
७. सन २०२२-२३ मध्ये संचालकांना, त्यांचे नातेवाईकांना व संचालक जेथे भागीदार आहेत अशा संस्थेला दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
८. सन २०२१-२२ सालचा दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
९. निवडणूक २०२२-२३ ते २०२३-२७ आढावा घेणे.
१०. गैरहजर सभासदांना क्षमापीत करणेबाबत विचार करणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे

संचालक मंडळाच्या आदेशावरुन.....

स्थळ : कोल्हापूर दि. २५/०८/२०२३

**माधव शामराव करंदीकर** — उपाध्यक्ष
**गोपाळ विनायक गोरे** — अध्यक्ष
**सौ. सुप्रिया अ. खाडिलकर** — सचिव

**व सर्व संचालक मंडळ**

**सूचना -** (१) गणपूर्तीअभावी वरील बैठक तहकूब झाल्यास ती अर्ध्या तासानंतर त्याचदिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा बैठकीस गणपूर्तीचे बंधन असणार नाही. (२) ज्या सभासदांना सूचना अगर प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी संस्थेमध्ये **दि. ०२/०९/२०२३** पर्यंत ते लेखी द्यावेत.

# कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.) कोल्हापूर

४२८,'तुळजाभवानी संकुल', बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६०१२

**पॅन क्र. AABTK2810K**

## ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

स.न.वि.वि.

कोल्हापूर चित्पावन संघाची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक १०/०९/२०२३ रोजी सकाळी ११ वा. ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम,** मंगळवार पेठ, कोल्हापूर येथे घेण्याचे आयोजित केले आहे. सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, आपण या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

### * सभेपुढील विषय*

१) मागील सभा दि. २१/८/२०२२ रोजीचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) दि. ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील ताळेबंदास मंजूरी देणे.

३) सन २०२३-२४ सालासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.

४) सुवर्ण चतुष्कोन आढावा व संकल्पपूर्ती नियोजन व चर्चा करणे.

५) लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.

६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

येणे प्रमाणे असे. ता. २५/०८/२०२३

संचालक मंडळाच्या आदेशावरून......

**केदार जोशी**
कार्यवाह

**सदानंद दिनकर मराठे**
अध्यक्ष

**सर्व संचालक मंडळ**

**सूचना:- गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. सदर सभेला गणपूर्तीचे बंधन असणार नाही.**

**टीप : श्री परशुराम पतसंस्था व कोल्हापूर चित्पावन संघ हिशेब व अहवाल त्या त्या संस्था कार्यालयात पहाता येतील.**

श्री परशुराम पतसंस्थेच्या सभासदांना नम्र विनंती की, त्यांनी आपले समभाग रु. १,०००/- किंवा त्याचे पटीत करण्यासाठी उर्वरित रक्कम भरावी व आपले समभाग रु. १,०००/- किंवा त्या पटीत करून घ्यावेत.

**- अध्यक्ष**

**विद्यार्थी गुणगौरव व वार्षिक सभेच्या माहितीसाठी कृपया आपल्या कार्यालयात संपर्क साधून माहिती घ्यावी. तसेच पात्र विद्यार्थ्यांची माहिती वेळेत भरून देऊन दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित रहावे.**

# आम्ही कृष्णसख्या - कर्माबाई

**(लेखांक आठवा)**

आज आपण राजस्थान येथील एक श्रेष्ठ स्त्री संताची कथा जाणून घेणार आहोत. संत कर्माबाई एक जाट स्त्री होती. तिला भक्त शिरोमणी कर्माबाई असे संबोधले जाते.

राजस्थानमधील नागौर जिल्ह्यात कालवा या गावी तिचा जन्म झाला. तिच्या वडिलांचे नाव जीवनजी डुडा असे होते. तिचे वडील हे स्वतःएक कट्टर कृष्णभक्त होते. त्यांना अनेक वर्षे मुलबाळ नव्हते. अनेक वर्षांपर्यंत नवस-सायास केल्यावर १६१५ साली त्यांच्या पोटी एक मुलगी जन्माला आली. जन्मतःच तिच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज होते. मुलगा होण्याच्या इच्छेने नवस-सायास केल्यावर परमेश्वराने मुलगीच जन्माला घातली हे पाहून आलेल्या नाराजीचे रूपांतर मुलीच्या चेहऱ्यावरचे तेज बघून खुशीत बदलले. मुलीचे नाव कर्मा असे ठेवले.

अतिशय धार्मिक आणि कृष्णभक्त अशा घरात जन्माला आलेली कर्मा लाडाकोडात वाढत होती. मोठी होत होती. तिच्या वडिलांचे तिच्यावर अतोनात प्रेम होते. तिच्या वडिलांचा तिच्यावर खूप प्रभाव होता. त्यांची कृष्णभक्ती कर्माबाईमध्ये झिरपत होती. पण अजून त्या श्रेष्ठ भक्तिभावनेचे प्रकटीकरण व्हायला काहीसा अवकाश होता. कारण कर्मा अजून वयाने लहान होती.

कर्मा जेव्हा तेरा वर्षाची झाली, तोपर्यंत तिला तिच्या आईने सर्व गृहकृत्यांमध्ये तरबेज केले होते. सर्व प्रकारचे उत्तम घरकाम करण्यात ती प्रवीण झाली होती.

एकदा जीवनजींच्या मनांत आले की आपण सर्वजण मिळून पुष्कर यात्रेला जावे. पुष्कर हे राजस्थानमधील एक महत्वाचे धार्मिक यात्रा स्थळ आहे. पौर्णिमेला तिथल्या तलावात स्नान करण्यासाठी अनेकजण येत असतात. तेव्हा या यात्रेचे फार मोठे पुण्य समजले जाते. म्हणून एकदा तरी पुष्कर धर्मस्थळावर पौर्णिमा-स्नानाला जावे असा विचार जीवनजींनी केला. सुरुवातीला सर्वजणांनीच जावे असा विचार होता. परंतु घराला कुलूप लावून जायचे तर एक मोठीच अडचण होती. श्रीकृष्णमूर्तीला रोज पूजा करून नेवैद्य कोण, कसा दाखवणार? म्हणून जीवनजी आणि पत्नी अशा फक्त दोघांनीच यात्रेला जायचे ठरले. घर सांभाळण्यासाठी आणि मुख्य म्हणजे देवपूजा-नेवैद्य हे करण्यासाठी कर्माला मागे ठेवायचे ठरले. दोघे नवरा बायको यात्रेला निघून गेले आणि हाच कर्माच्या आयुष्यातील निर्णायक क्षण ठरला. दुसऱ्या दिवशी सकाळी ती लवकरच उठली. आज तिला आईच्या हाताखाली काम करायचे नव्हते, तर स्वतः सगळी जबाबदारी निभवायची होती. आणि तितकी तिला घरकामाची सवय नव्हती.

देवाला वेळेवर नेवैद्य दाखवायलाच पाहिजे , पण सर्व पारोसे काम करून, आंघोळ करून, नेवैद्याची खिचडी करायची तर उशीर झाला असता. देवाला भूक थांबवावी लागली असती तर देव नाराज झालाच असता, पण वडील परत आल्यावर त्यांचीही नाराजी पत्करावी लागली असती. म्हणून कर्माबाईने सकाळी उठल्या उठल्या बाजरीची खिचडी बनवायला घेतली.

बाजरीची खिचडी बनवणे म्हणजे वेळखाऊ काम. आधी बाजरी काही काळ भिजवा. मग ती कुटून तिची साले वेगळी करा. मग तिच्यात डाळ मिसळून शिजत ठेवा. या सगळ्या गोष्टींना वेळ लागतो आणि देवाला जेवायला घालायला उशिर होऊन कसे चालणार? म्हणून कर्माबाईने आधी खिचडीच करायला घेतली. काही वेळानंतर खिचडी झाली. ती तिने एक थाळीत वाढली, त्यात खूपसे तूप घातले, गूळ घातला आणि ती थाळी तिने कृष्णमूर्ती समोर नेऊन ठेवली - देवा, तुझा नेवैद्य मी बनवला आहे. वाढून तुझ्यासमोर आणूनही ठेवला आहे. मला आता घरात इतरही खूप कामे आहेत. तेव्हा तू आता जेव. तोवर मी माझे सर्व काम उरकून येते.

असे देवाला बजावून कर्मा आपल्या कामाला निघून गेली. तिची आईसुद्धा तिला लहानपणापासून असेच सांगत असे. तिची आई जशी घरातले काम करता करता तिच्या खाण्याकडे लक्ष ठेवत असे, तशी तीही देवाकडे लक्ष ठेवत होती. पण बराच काळ गेला तरी देवाने नेवैद्य खाल्लाच नाही.

घरातील सगळी कामे उरकल्यावर कर्मा पुन्हा देवाजवळ आली. तिला वाटले की खिचडीमध्ये तूप-गूळ कमी असेल, म्हणून तिने आणखी तूप, आणखी गूळ खिचडीवर घातले आणि देवाला खाण्यासाठी बजावून ती पुन्हा आपल्या कामाला निघून गेली.

पण पाषाण मूर्ती कशी खाणार? पण ही गोष्ट कर्माच्या लक्षात आली नाही. बराच काळ गेल्यावरसुद्धा

जेव्हा देव जेवेना, तेव्हा कर्मा त्याच्यासमोर धरणे धरून बसली. कधी कधी ती स्वतः लहानपणी खाण्यासाठी हट्ट करीत असे, खात नसे, तेव्हा तिची आई तिची समजूत घालायची तशीच समजूत ती देवाची घालू लागली. देवा, तू मी केलेली खिचडी का खात नाहीस? तुला आवडली नाही का? मला आईसारखा चांगला स्वयंपाक करता येत नाही, चार वेगवेगळे पदार्थही करता येत नाहीत. पण मी प्रेमाने तुझ्यासाठी नेवैद्य बनवला आहे, तो तू गोड मानून खा ना देवा ! तू असा उपाशी राहिलास तर कसं चालेल? मला बाबा सांगून गेले आहेत की, देव जेवल्यानंतरच तू जेवायचं. मला पण आता भूक लागली आहे. पण मी बाबांचा शब्द कसा मोडणार? तुझं जेवण झाल्याशिवाय मी कशी जेवणार?

अशा प्रकारे तरतऱ्हेने कर्माबाई देवाला विनवत राहिली, पण देव काही जेवेना. शेवटी कर्मा देवाच्या पायाशी थकून बसून राहिली. दुपारची जेवणाची वेळ तर केव्हाच टळून गेली. थाळीत वाढलेली खिचडी थंडगार झाली. कर्मा भुकेने कासावीस झाली होती, सतत देवाला खिचडी खाण्याबाबत विनवत होती. पण देव काही तिचे ऐकत नव्हता. तर तीही तिचा आग्रह, हट्ट सोडत नव्हती. शेवटी संध्याकाळी उशीरा देवच हरला. स्वतःच्या पायाशी धरणे धरून बसलेल्या उपाशी तापाशी कर्माला पाहून देवाचे मन कळवळले, झाली तितकी तिच्या भक्तीची परीक्षा पुरे झाली, असा विचार देवाने केला आणि मूर्तीतून आवाज आला – अग कर्मा, मी असा उघड्यावर नेवैद्य कसा खाणार? तू माझ्यापुढे पडदा तर लावलाच नाहीस !

हे ऐकल्यावर कर्माच देवावर रागावली, म्हणाली – इतकी साधी गोष्ट आणि त्यासाठी तू हटून बसलास ! मी वयाने लहान आहे. इतके दिवस या सगळ्या उपचार पद्धती माझे वडील पाळत होते. मग मला कसं कळणार? तुला सुरुवातीलाच सांगता येत नव्हतं का? उगाच हट्ट करून स्वतःही उपाशी राहिलास आणि मलाही उपाशी ठेवलंस !

असं म्हणून कर्माने देवाच्यापुढे ठेवलेली नेवैद्याची थाळी आणि स्वतःमध्ये स्वतःच्या ओढणीचा पडदा लावला. त्या पडद्याच्या बाहेर बसून ती देवाच्या जेवणाची वाट पाहत बसून राहिली. काही वेळातच देवाचा आवाज आला – कर्मा, थाळी घेऊन जा. माझं जेवण झालं आहे .

कर्माने पडदा बाजूला केला, पाहिलं तर थाळी चाटून पुसून स्वच्छ झालेली होती. कर्माला अतोनात आनंद झाला, एक देवाने तिचं ऐकलं म्हणून आणि दुसरं आता तिला जेवता येईल म्हणून. जेवण झाल्यावर तिने सगळी आवराआवर केली, झाकपाक केली आणि झोपायला गेली. पण झोपी जाण्याआधी तिने देवाला बजावले की उद्या इतका वेळ जेवणासाठी लावू नकोस, मला पण भूक लागते हे विसरू नकोस.

मग रोजच हा क्रम सुरु झाला. रोज सकाळी उठल्या उठल्या कर्माबाई खिचडी बनवून देवाला जेवू घाली आणि मगच आपले स्नान, पूजा, घरकाम वगैरे आटोपत असे. काही काळानंतर तिचे आईवडील यात्रेहून परत आले, तेव्हा वडिलांना तिने सांगितले की देवाला रोज कशी जेवू घालत होती ते. वडिलांना ती एक काल्पनिकताच वाटली. ते कर्माला म्हणाले – मुली, असं खोटं नाटं बोलू नये – पण रागावले नाहीत कारण मुलगी त्यांची फारच लाडकी होती. कर्माने खूप खूप सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना ते पटेना. शेवटी ते तिला एवढंच म्हणाले – मला उद्या दाखवं हं देव जेवताना. त्याच रात्री देव त्यांच्या स्वप्नात आला आणि त्याने कर्माच्या कहाणीची, सर्व सत्यतेची, ग्वाही दिली.

जीवनजी स्वतःही कृष्णभक्त होते, म्हणून त्यांना अत्यंत आनंद झाला. त्यांनी देवाचा नेवैद्य बनवण्याचं आणि त्याला जेवू घालण्याचे काम कायमच कर्माबाईवर सोपवलं. अशा तऱ्हेने रोज सकाळी अगदी लवकरच देवाला कर्माबाईची खिचडी खायला मिळू लागली.

काही काळानंतर कर्माबाईचे आई वडील निवर्तले आणि कर्माबाईचे मन घरात लागे ना. तिने तीर्थयात्रेस जायचे ठरवले. आणि ती पुरीच्या जगन्नाथ मंदिरात येऊन स्थिरावली. पुष्कळ ठिकाणी यात्रा केल्यानंतर तिला पुरीलाच रहावे असे वाटले. तिने मंदिराच्या परिसरात एक झोपडी बांधली आणि तिथे ती राहू लागली. ती कुठेही असली तरी तिचा देवाला खिचडी खाऊ घालण्याचा नेम काही चुकत नव्हता. पुरीला ती तेच करत होती.

पण एक दिवस देवाला नेवैद्य दाखवून झाल्यावर, एक छोटासा, काळा सावळा बालक तिच्याकडे आला आणि तिच्याकडे खायला मागू लागला. तिने त्यालाही खिचडी दिली. जेवून खाऊन तृप्त होऊन तो मुलगा निघून गेला. पण रोजच तो तिच्याकडे येऊ लागला खिचडी खाण्यासाठी. कर्माबाईही सकाळी लवकर उठून देवाला खिचडीचा नेवैद्य देत असे, तोवर तो छोटा मुलगा येत असे, त्याला वाढत असे. मग ती स्वतःचे स्नान, पूजा आणि बाकी घरकाम उरकत असे. पण हा परिपाठ एके

दिवशी अचानक खंडित झाला. गावात आलेल्या साधूने तिला सांगितले की स्नान केल्याशिवाय देवाचा नेवैद्य बनवणे हे गैर आहे, त्याने तुला पाप लागते आहे. कर्माबाईने साधूच्या सांगण्याप्रमाणे आंघोळ करून खिचडी बनवायला सुरुवात केली. पण खिचडीला उशीर होऊ लागला. तो छोटा मुलगा पण बराच वेळ खिचडी मागत राही आणि मग घाईघाईने जेवून निघून जाई.

एक दिवस मात्र आश्चर्यच घडले. सकाळी पुजाऱ्याने जेव्हा जगन्नाथ मंदिराचा दरवाजा उघडला आणि देवाला स्नान घालू लागला तेव्हा पुजाऱ्याच्या लक्षात आले की देवाच्या तोंडाला खिचडी लागली आहे. पुजाऱ्याला भयंकर राग आला आणि त्याने सर्व कर्मचाऱ्यांवर, भक्तांवर राग काढायला सुरुवात केली. असाच पूर्ण दिवस सरला आणि रात्री त्या कृष्णभक्त पुजाऱ्याच्या स्वप्नात देव आला. म्हणाला, तू आज सगळ्यांवर रागवलास, पण इतर कुणी माझं पावित्र्य भंग केलेलं नाही. असं म्हणून देवाने सगळी खरी खरी हकीकत पुजाऱ्याला सांगितली आणि मला रोज सकाळी कर्माबाईची खिचडी हवीच आहे – असेही सांगितले. पुजारी खरंच कृष्णभक्त होता. त्याला कर्माबाईचा महिमा पटला आणि त्याने तिला सन्मानाने देवळात आणले , अगदी देवाच्या पायाशी. ती जातीने तेली असल्याने इतके दिवस तिला मंदिरात प्रवेश नव्हता. पण देवानेच तिला स्वतःच्या पायाशी स्थान दिले.

अशीच काही वर्षे गेली. कर्माबाई आता वयस्कर होऊ लागली होती. पण देवाला खिचडी खाऊ घालण्याचा तिचा नियम तिने चुकवला नाही. एक दिवस सकाळी पुजारी मंदिरात सेवेसाठी हजर झाला, तेव्हा त्याच्या दृष्टीला देवाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत असलेल्या दिसल्या. देवाने त्याला कर्माआई प्रभुचरणी विलीन झाल्याची बातमी सांगितली – देवच जिला आई म्हणत असे तिची थोरवी काय वर्णावी ?

यातून आपण काय बोध घ्यायचा? तर देवाची सेवा एकाच प्रकारे करण्याची गरज नाही. देवाची सेवा करताना कर्मकांडे, उपचार पद्धती, पूजाविधी या सर्वापेक्षा भाव महत्वाचा. आपल्या सर्व संतांनी हाच मंत्र दिला आहे – भाव तेथे देव ! देवाला जात, पात, वय, लिंग, सामाजिक स्थान, पैसा अडका या सगळ्यांशी काही देणे घेणे नसते; त्याला महत्वाचा वाटतो तो भक्ताचा भाव मग कधी मातृभाव असो, सखी भाव असो, प्रिया भाव असो, पत्नी भाव असो, या कोणत्याही भावात प्रेमभाव जपणारा त्याचा भक्त हाच त्याला अतिप्रिय असतोच आणि तो अशा आपल्या भक्ताला भवसागर तरून पल्याड पोहोचवतो.

कर्माबाई ही तर एक अशिक्षित म्हणता येईल अशी काहीशी भोळी भाबडी स्त्री होती. पण तिने देवाला आपल्या मातृभावाने जिंकून घेतले. स्वतःशी बांधून टाकले. इतके की देव तिच्या साध्याशा खिचडीला भाळला आणि बालरूपात तिच्या झोपडीत येऊन खिचडी खाऊ लागला. त्याशिवाय देवाची भूक भागेना.

देवालासुद्धा भक्ताच्या भक्तीची भूक लागते. सवय होते आणि मग मात्र देव आणि भक्त मनाने एकरूपच होऊन जातात. कुठल्या न कुठल्या नात्याने बांधले जातात. जशी कर्माबाई आणि कृष्ण आई– मुलाच्या नात्याने बांधले गेले. सुरुवातीला कर्माला– मी जेवायला हवं असेल तर पडदा कर असं सांगणारा कृष्ण तिच्या घरी जाऊन, तिच्या हाताने जेऊ लागला ! त्यासाठी त्याने छोट्या बाळाचे रूप धारण केले. कर्माबाईच्या श्रेष्ठ भक्तीमुळे तिच्या आणि देवामधला पडदा नाहीसा झाला. आणि ती कृष्णमय होऊन गेली. जी एक सामान्य स्त्री होती, तिची सर्व कथा, तिचा मृत्यू सांगण्यासाठी देवाला बोलावं लागलं, पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन ! तिचा मृत्यू झाल्यावर देवाच्या डोळ्यातून अश्रू धारा वाहू लागल्या! त्या कदाचित आनंदाश्रूंच्याही असाव्यात कारण मृत्यू झाल्यामुळे कर्माबाई पूर्णपणे प्रभू रूपात विलीन झाली! शरीर अस्तित्वात असल्याने दोघांमध्ये पौर्णिमेचा चंद्र आणि चतुर्दशीचा चंद्र यात जेवढे अंतर असते, तेवढे तरी अंतर राहिलेच होते. तेही तिच्या शरीर त्यागामुळे नष्ट झाले!

देवाने पुजाऱ्याला सांगितले की आता रोज मला सकाळी खिचडी कोण खाऊ घालणार म्हणून मी रडतो आहे. पुजाऱ्याने त्याच्या कुवतीप्रमाणे रोज (अगदी आजपर्यंत सुद्धा) जगन्नाथाला सकाळी सकाळी बाळ भोग म्हणून खिचडी देण्याची प्रथा पाडली खरी पण त्यात कर्माबाईचा श्रेष्ठ भक्ती भाव कसा काय असणार ?

या अशा अतिश्रेष्ठ भक्तीभावामुळेच कर्माबाईला भक्त शिरोमणी अशी पदवी मिळाली. आजही जगन्नाथाची रथयात्रा कर्माबाईच्या समाधीजवळ थांबूनच पुढे जाते. नाहीतर रथ पुढे सरकतच नाही.

इतकी जिची भक्ती श्रेष्ठ होती त्या कर्माबाईला सुद्धा कृष्णसख्या या नामाभिधानात सामील न करून कसे चालेल?

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,** मोबा. ९९२००५८७०५

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ४ : कर्म ब्रह्मार्पण योग**

**श्रीभगवानुवाच ।**

**अभिलाष भय क्रोध त्यजिती ।**
**माझिया आश्रये करूनी असती ।**
**बहुत ज्ञान तपें मज पावती । पवित्र होऊनिया ।।**
नाहीं तृष्णा भय क्रोध माझ्या सेवेंत तन्मय ।
झाले ज्ञान–तपें चोख अनेक मज पावले ।।१०।।

**जैसे ते मज भजती । त्यासी मी भजे तैसिया रीती ।**
**माझे मार्गी वर्तती । सकळ लोक रे अर्जुना ।।**
भजती मज जे जैसे भजे तैसा चि त्यांस मी ।
माझ्या मार्गास हे येती लोक कोणीकडूनि हि ।।११।।

**जे कर्मसिद्धी इच्छुनी ।**
**चित्त ठेविती अन्यदेवता भजनीं ।**
**ते मनुष्यलोकीं तत्क्षणीं । कर्मफळ पावती जाण ।।**
जे कर्म–सिद्धि वांछूनि यजिती येथ दैवतें ।
मनुष्य–लोकीं कर्माचे पावती फळ शीघ्र ते ।।१२।।

**म्यां सृजिले चतुर्वर्ण । गुणकर्म विभागून ।**
**त्याचा कर्ता अकर्ता मी जाण ।**
**परि अलिप्त अव्ययें असे ।।**
निर्मिले वर्ण मीं चारी गुणा–कर्मे विभागुनी ।
करूनि सर्व हे जाण अकर्ता निर्विकार मी ।।१३।।

**तयाचे कर्मी न लिंपे पाही ।**
**कां जे मजकर्मी इच्छा नाहीं ।**
**ऐसें जो तत्व आणे पाही । तो कर्मी न बांधिजेल ।।**
कर्मे न बांधिती मातें फळी इच्छा नसे मज ।
माझे स्वरूप हें जाणे तो कर्मांत हि मोकळा ।।१४।।

**ऐसे जाणुनी करी कर्म ।**
**पूर्वी मोक्ष इच्छुनी केला हा धर्म ।**
**त्या कारणें वर्णाश्रम । हे पूर्वी पूर्वजी केले होतें ।।**
केलीं कर्मे मुमुक्षूंनीं पूर्वी हे तत्व जाणुनी ।
तैसीं तूं हि करीं कर्मे त्यांचा घेऊनि तो धडा ।।१५।।

**कर्म अकर्म तें कोण । दोही बांधला नाहीं पां कवण ।**
**ऐक ते मी निवडोन सांगेन ।**
**ते जाणील त्या उत्तम मोक्ष होय ।।**
नेणती जाणते ते हि काय कर्म अकर्म हें ।
तुज तें सांगतों कर्म जाणूनि सुटशील जें ।।१६।।

**कर्मी ज्ञान असावें । विकर्म मनी जाणावें ।**
**अकर्मी चित्त न द्यावें । कर्म गति गहन म्हणोनियां ।।**
सामान्य कर्म जाणावें विकर्म हि विशेष जें ।
अकर्म तें हि जाणावें कर्माचें तत्त्व खोल हें ।।१७।।

# मुस्लिम स्त्री कलाकार

## (१)

मुस्लिम स्त्री कलाकारांनी भारतीय चित्रपट सृष्टीसाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टी उंचावर नेऊन ठेवली आहे व देशोदेशीच्या रसिकांना आनंद दिला आहे. अशा मुस्लीम स्त्री कलाकारांवर मी लेखमाला लिहिणार आहे. तुम्हाला आवडेल अशी आशा आहे. यातील पहिली कलाकार आहे 'फातमा बेगम'.

'फातमा बेगम' यांचा जन्म १८९२ साली झाला. ती भारतीय चित्रपट जगातील पहिली स्त्री दिग्दर्शिका आहे. ती अभिनेत्री, पटकथा-लेखिका व निर्माती सुद्धा होती. तिने स्वत:ची 'फातमा फिल्मस्' या नावाची निर्मिती संस्था काढली होती. त्याचेच नाव नंतर 'व्हिक्टोरिया-फातमा फिल्मस्' असे करण्यात आले.

फातमा बेगम जुन्या काळातील राजघराण्यातील राणीसारखी दिसत होती. तिचा चेहरा करारी होता. नाक सरळ व धारदार होते. तिची त्वचा खूपच फेअर होती. ती डार्क मेकअप करत असे. तिची एक वेगळीच हेअर-स्टाईल होती. केसांच्या बटा ती दोन्ही भुवयांच्या कडेने खाली सोडत असे व मध्यभागी असलेले केस ती मागे वळवत असे. त्यामुळे तिचे कपाळ भव्य दिसत असे.

तिला तीन मुली होत्या. झुबैदा, सुलताना व शहजादी. या तिघीही मूक-चित्रपटातील सुपरस्टार होत्या.

फातमा बेगम हिने सुरुवातीला उर्दू नाटकात काम करायला सुरुवात केली. नंतर ती चित्रपटाकडे वळली. तिने अर्देशीर इराणी यांच्या 'वीर अभिमन्यू' या मूकपटात काम केले. हा तिचा पहिला सिनेमा. हा सिनेमा १९२२ साली प्रदर्शित झाला.

त्यावेळी स्त्री पात्राचे काम पुरुषच करत असत. त्यामुळे फातमा पहिली स्त्री सुपरस्टार ठरली.

१९२६ साली तिने 'फातमा फिल्मस्' या नावाची संस्था सुरू केली. त्याचेच नाव १९२८ साली 'व्हिक्टोरिया-फातमा फिल्मस्' असे करण्यात आले. अद्‌भुतरम्य, काल्पनिक व जादूमय असे चित्रपट काढणारी अशी ती निर्मिती ठरली. तिच्या चित्रपटांमध्ये ट्रिक फोटोग्राफी खूप असे. त्यासाठी ती भरपूर पैसा खर्च करायला तयार असे.

कोहिनूर स्टुडिओ व इंपिरियल स्टुडिओ येथे ती अभिनेत्री म्हणून काम करत असे व स्वत:च्या संस्थेत लेखिका, दिग्दर्शिका, निर्माती व अभिनेत्रीचे काम करत असे.

१९२६ साली फातमाने स्वत:च्या दिग्दर्शनाखाली 'बुलबुले परिस्तान' हा चित्रपट काढला आणि ती भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिली स्त्री दिग्दर्शिका ठरली. आपल्या तीनही मुलींना तिने आपल्या सिनेमात काम दिले व त्यांची चित्रपटातील करिअर सुरू करून दिली.

तिने ज्या चित्रपटात काम केले किंवा दिग्दर्शन केले ते खालीलप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| १९२४ | सती सरदारबा (अभिनय) |
| १९२४ | पृथ्वीवल्लभ काला नाग (अभिनय) |
| १९२४ | गुले बकावली, राजा हरिश्चंद्र (अभिनय) |
| १९२५ | गौड बंगाल, मुंबई-नी-मोहिनी, देवदासी |
| १९२६ | इंद्रजाल, बुलबुले परिस्तान |
| १९२८ | हिर रांझा, चंद्रावली |
| १९२९ | मिलन, दिनार, कनकतारा, शकुंतला, नसीब नी देवी |
| १९३४ | सेवा-सदन |

यापैकी काही चित्रपटांना तिने स्वत: दिग्दर्शन केले होते.

तिने अभिनय केलेला शेवटचा सिनेमा म्हणजे १९३८ साली आलेला 'दुनिया क्या है' हा सिनेमा व तिने दिग्दर्शित केलेला शेवटचा सिनेमा म्हणजे 'नसीन-नी-देवी (Goddess of Luck)' हा १९२९ साली आलेला सिनेमा

फातमा बेगम १९८३ साली म्हणजे वयाच्या ९१ व्या वर्षी अनंतात विलीन झाल्या. या ९१ वर्षांपैकी १६ वर्षे त्यांनी चित्रपटसृष्टीत काम केले.

सुमारे १०० वर्षांपूर्वी चित्रपटसृष्टीत असामान्य असे काम करणाऱ्या फातमा बेगम यांचे नाव आज किती जणांना माहीत असेल ते सांगता येत नाही.

**– प्रकाश गानू,**
मोबा.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# म्हणींचे म्हणणे

## आले मी नांदायला... आणि मडके नाही रांधायला

ऑफिसमध्ये खूप गडबड चालू होती. वरच्या ऑफिसमधील पदाधिकारी रूटीन ऑडीट/ सर्व्हेसाठी आपल्या शाखेत येणार आहेत ही नोटीस लागून चार दिवस झाले होते. जो तो आपले टेबल, फाइल्स, लॅपटॉप अपडेट करत होता. जेणेकरून आपले काम आपण चोख करतो, हे नमूद व्हावं. वरच्या अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

मधुकरराव आपले टेबल सोडून इतरांच्या कामाचे काय हेच बघत होते. सुजीतने चार वेळा त्यांना सांगितले देखील, 'अहो मधुकर सर, तुम्ही तुमचे काम आवरा. वरिष्ठ सर कधीही येतील.' हो, हो म्हणत त्याचे टेबल सोडून ते पुढे गेले, दुसऱ्याच्या टेबलाजवळ !!

थोड्या वेळाने वरिष्ठ अधिकारी शहा आणि लोंढे आले. सगळ्यांचे कामकाज बघितले. अन मधुकरच्या टेबलापाशी आल्यावर मधुकरची लगबग सुरू झाली. त्या दोघांनी प्रश्न सुरू केल्यावर मधुकर त्यांना म्हणाला, अहो कामच इतकं असते ना, काय आणि कस आवरणार पटपट? कधी नेटवर्क नसतं. कधी साईट-सर्व्हर स्लो असते, किती अडचणी असतात. तरीही कारणांची भली मोठी लिस्ट वरिष्ठांना सांगत मधुकर फाईल्स गोळा करत बसला. ऑफिसमधील सगळ्यांनी एकमेकांना नजरेने सांगितले, 'आले मी नांदायला आणि मडके नाही रांधायला...'

'हिरवाई' संस्थेच्या कामासाठी रायबाला शिपाई म्हणून घेतला. काम काय करायचं तर रोजची वर्तमानपत्र, नोटीस आलेली पत्रकं नीट फाईल करून ठेवायची. टेबल साफ करायचं. एकूण काय किरकोळ ऑफिसवर्क असतं तेच सारं. पण संजीवनीचा एकही दिवस रायबाला ओरडल्याशिवाय गेला नाही. काहीतरी टगळमंगळ करायचाच. दहा काम केली तर चार काम उद्यावर ढकलायची, आणि ती कामं का व कशी करू शकलो नाही, हे समोरच्याला पटवून द्यायचे.

फर्निचर पुसले का रायबा? संजीवनीने सहज विचारलं. रायबा लगेच उत्तरला, 'अहो गाड्यांची वर्दळ इतकी. जाम ट्रॅफिक. डस्ट तर एवढी उडते की आता पुसलं तरी अर्ध्या तासात डोंगर उभा राहिल. बरे कापडं तरी आजकाल चांगली मिळतात कुठे? संजीवनीने रायबाकडे बघून हात जोडले. धन्य आहेस!!

सुनिता व रेखाताई एकाच गल्लीत राहतात दोघी. त्यामुळे एकमेकींच्या सवयी जाणून होत्या. काही काही माणसं अशीच असतात. करायचं काही नसत, पण आव असा आणतील की ज्याचे नाव ते ! मागच्या वेळचा प्रसंग आठवला त्यांना. गल्लीतील सगळ्या महिला वर्गाने मिळून हळदीकुंकूचा मोठा कार्यक्रम करायचा ठरवला. प्रत्येकीने जे जे शक्य होतं ते ते सगळं लिहून, नियोजन करून कार्यक्रम छान करायचा हे ठरवलं. सुनिताने हलवा बाजारातून आणून द्यायचे असे ठरले. जमलंच तर बायकांना द्यायला गुलाबाची फुलं आणायची उत्साहाने जबाबदारी स्वीकारली. झालं! हळदीकुंकूचा दिवस उजाडला. संध्याकाळी बायका एक-एक येण्याला सुरुवात झाली. बाकी सगळी तयारी झाली. पण सुनिताचा पत्ताच नाही.

वाट बघून शेवटी फोन लावला, तर सुनिता म्हणाली, 'अय्या आवरतेय मी. काळी साडी नवीन आणली. त्याच्याच गडबडीत हलवा आणि फुलं कशी आणणार? अन् फुलं चांगली मिळाली तर बरी. बरं आवरते, येते छान नटून ! फोन ठेवते हं.'

गल्लीतील बाकीच्या महिलांना ह्याची कल्पना होती. म्हणून त्यांनी आधीच दुसऱ्या मैत्रिणीला ही तयारी करायला सांगितले होते. इतक्यात गडबडीत सुनिता आली. हळदीकुंकूच्या समारंभात आलेल्या एका आज्जींनी हा घडला प्रकार ऐकला होता. सुनिताला बघताच त्या म्हणाल्या, 'आले मी नांदायला आणि मडके नाही रांधायला...' हे ऐकल्यावर बाकीच्या सगळ्या जणी जोरजोरात हसायला लागल्या. काही काही माणसं अशीच असतात... करायचं काही नसतं, पण आव असा आणतील की ज्याचे नावे ते!! समाजात अशा प्रकारचे लोक आपल्या अवती भवती भेटत असतात. मुळातच त्यांना फक्त रोजचा दिवस ढकलायचा असतो. माणसाला अशा सवयीमुळे सहकारी- घरातील माणसं नावं तर ठेवतातच म्हणूनच आपल्या चुकीच्या सवयी प्रयत्नपूर्वक-संस्कारातून दूर कराव्यात. नाहीतर समाजात आले मी नांदायला, मडकं नाही रांधायला ही वृत्ती बळावेल.

- **वैदेही जोशी**, मोबा. ९५४५६३५४६५

**शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा**

# ज्ञानसूर्याची सावली

**(लेखांक सत्ताविसावा)**

१०

कालचक्र ! सृष्टीत घडणारी कुठलीही घटना शुभ-अशुभाची, सुख-दु:खाची, जन्म-मृत्युची, तर्क-अतर्काची, आकलन-अनाकलनाची, उत्पती-लयाची, कुठलीही घटना कालचक्राची गती थांबवू शकत नाही. विनाशी-अविनाशी घटनेचा कोणताही परिणाम कालचक्राच्या गतीवर होत नाही. ते चालतच राहतं. चालतच राहतं आणि काळ पुढे सरकत राहतो. विठ्ठलपंतांचं घर तरी याला अपवाद कसं ठरेल? काळ पुढं सरकत राहिला. आई-बाबांच्या अपमृत्यूच्या दु:खावर काळाच्या गतीचा लेप चढला आणि त्याची तीव्रता कमी झाली. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता ही चारही भावंडं आई-बाबांच्या मृत्यूचं, मृत्यूमुळे झालेल्या वियोगाचं, आलेल्या पोरकेपणाचं दु:ख बाजूला ठेवून पुन्हा उभं राहण्याची धडपड करत राहिली.

निवृत्ती-ज्ञानेश्वरांनी रोज पहाटे गंगेच्या घाटावर जाऊन ज्ञानसाधना करण्याचा प्रघात चालूच ठेवला, नव्हे आता त्याला अधिक गती आली आणि त्या दोघांनाही त्यात अधिक गती आली होती. ज्ञानसाधना करून झाली की, दोघं माधुकरी मागायला जात. तोवर इकडे सोपान आणि मुक्ताही पहाटेच उठलेले असत. मुक्ता सडा-रांगोळी करी. नदीच्या घाटावरून चार घागरी पाणी भरे. तोवर सोपानाही ज्ञानसाधनेला बसलेला असे. भगवद्गीता, संस्कृत श्लोक, संस्कृत व्याकरण यांची ओळख तर विठ्ठलपंतांनीच त्याला करून दिली होती. वेद-उपनिषदांच्या अभ्यासाची तोंडओळख निवृत्तीदादांकडून करून घेऊन त्यानं आता स्वत: वेदांच्या अभ्यासाला सुरुवात केली. सकाळच्या दोन प्रहरांपर्यंत तो हा अभ्यास करत असे. नंतर तोही माधुकरीसाठी जाई. माधुकरीसाठी जात असतानाही त्याच्या मनात वेदाभ्यासाचं चिंतन चाले. मनातल्या मनात त्यातल्या श्लोकांचं, ऋचांचं पठण, रामायण-महाभारत-व्यासपुराण या ग्रंथांचं पठण, मनन, अध्ययन, चिंतन, विश्लेषण, असा त्याचा मनातल्या मनात अभ्यास चालत असे.

**न हि ज्ञानेने सदृशं पवित्रमहि विद्यते।**

**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्माने विंदति।।**

या गीतेच्या वचनावर त्याचा अतिशय विश्वास होता आणि त्याचबरोबर महाभारतातील एकलव्य ही व्यक्तिरेखा त्याच्या आवडीची होती. खरंतर निवृत्तीदादा त्याला गुरुस्थानी होता; पण सोपानाचं शिक्षण मात्र एकलव्यासारखंच एकनिष्ठेनं चाललं होतं. सोपान जसाजसा मोठा होत होता, तसातसा त्याचा स्वभाव बदलत होता. लहानपणीचा बडबडा, शंकाखोर, सतत प्रश्न विचारणारा सोपान जाऊन त्या ठिकाणी शांत, समंजस, काहीसा अबोल, स्वत:च्या मनात उद्भवलेल्या प्रश्नांची उत्तरं शक्यतो स्वत:च शोधणारा आणि मिळाली नाहीच, तर निवृत्ती-ज्ञानेश्वराला विचारणारा, असा स्वाध्यायी सोपान तयार होत होता. फक्त मुक्ताईशी मात्र त्याचं वागणं तसंच अल्लड आणि खोडकर होतं. निवृत्ती-ज्ञानेशालाही या बदललेल्या सोपानाचं कवतिक वाटायचं. कधीकधी त्याच्या या लहान वयातल्या संयमाची, समंजसपणाची चिंताही वाटायची. तोच मुक्ता सोपानानं केलेली एखादी खोडी सांगत यायची की, निवृत्ती ज्ञानेश्वर पुन्हा नि:शंक व्हायचे. माधुकरी मागतानाही सोपान असाच संयमी आणि समंजस व्हायचा. कधीकधी तर त्याच्या संयमाची कसोटी लागायची; पण वयाच्या मानानं खरोखरच समंजस असलेला सोपान आपल्या संयमानं आणि शांत स्वभावानं सगळं व्यवस्थित निभावून जायचा.

एके दिवशी मात्र त्याच्या या संयमाची परीक्षा लागली. त्या दिवशी नेहमीप्रमाणे आपला वेद-उपनिषदांचा अभ्यास आटोपून सोपान माधुकरी मागायला गेला. सोपानाचं बालरूप, त्याची मधुर भाषा, विनम्र स्वभाव आणि समंजसपणा यांमुळे तो जिथं-जिथं माधुकरी मागायला जाई, तिथं-तिथं तिथल्या अन्नपूर्णांचं त्याच्याबद्दल चांगलं मत व्हायचं आणि काही-काही ठिकाणी तर गोग्रासाबरोबरच आणखी एखादा घास सोपानासाठी काढून ठेवला जायचा. विठ्ठलपंत-रुक्मिणीबाईंनी देहान्त प्रायश्चित्त घेतलेल्यालाही आता बरेच दिवस उलटून गेले होते. ब्रह्मवृंदांची वागणूक काहीशी सौम्य झाली होती. अजूनही पुरता राग निवळला

नव्हता; पण काळाच्या गतीनं जसं या भावंडांना आई-वडिलांच्या अपमृत्यूचं दु:ख विसरायला लावलं होतं, तसंच ब्रह्मवृंदांच्या मनातली अढीची तीव्रताही काहीशी कमी झाली होती. आधीच ब्रह्मवृंदांच्या घरातल्या स्त्रीवर्गाला रुक्मिणीबाईंच्या ऋजू आणि शांत, लाघवी स्वभावामुळे त्या कुटुंबाबद्दल सहानुभूती वाटे. त्यातच आता इतक्या दिवसांनंतर घरातल्या पुरुषवर्गाचाही कडवा विरोध काहीसा सौम्य झाला होता. त्यामुळेच की काय, माधुकरी मागताना या तिघांना फारसे कटू प्रसंग येत नसत. त्यातल्या त्यात सोपान लहान असल्यामुळे त्याच्या वाट्याला तर फार कमी कटुता येत असे.

असाच एक प्रसंग घडला; पण त्या प्रसंगातून सोपानाचा संयमीपणा, समंजसपणा जसा उठून दिसला, तशीच त्याची ज्ञानसंपन्नताही उजळून निघाली.

प्रसंग असा होता. श्रीधरपंतांच्या घरातील अन्नपूर्णा द्वारकामाईंचा सोपानावर विशेष लोभ. लग्नाला एक तप उलटून गेलं, तरी त्यांची कूस, अजूनही उजवली नव्हती. 'आई' या हाकेला आसुसलेल्या द्वारकामाईंना सोपानाची 'माई' ही गोड हाक सुखावून जायची. या गोऱ्या-गोमट्या, नीटस चेहऱ्याच्या, तेजस्वी डोळे असलेल्या, गोड बोलणाऱ्या, लाघवी वागणाऱ्या निरागस पोरावर - सोपानावर त्यांचा विशेष जीव होता. तो माधुकरी मागायला कधी येतो, याची त्या वाट पाहत असत. तो आला की, त्याच्यासाठी काढून ठेवलेला एखादा बत्तासा, पेढा त्याच्या हातावर ठेवत आणि मगच माधुकरी घालत. अर्थात, हे सगळे श्रीधरपंतांच्या माघारी चालत असे. श्रीधरपंतांच्याही हे कानांवर येई; पण तेही त्याकडे कानाडोळा करत असत. कर्मठ कर्मकांडाच्या पालनापायी विठ्ठलपंतांसारख्या प्रकांड पंडिताला आणि रुक्मिणीबाईंसारख्या साध्वीला देहत्याग करावा लागला आणि याला काही अंशी का होईना आपण जबाबदार आहोत, याची बोच त्यांच्या मनाला कुठंतरी लागून राहिली होती. धर्मसभेच्या नियमांचं पालन करता-करता आपली मानसिकता कर्मठपणाकडे कधी झुकली आणि त्या नियमांचं पालन करताना आपण माणुसकी विसरलो की काय, अशी खंत त्यांच्या मनाला कधीकधी वाटायची. म्हणूनच हा निरागस सोपान माधुकरी मागायला आला की, आपली पत्नी त्याचे काहीसे लाड करते, हे माहीत असूनही ते तिकडे दुर्लक्ष करत. आजही तसंच झालं. सोपानाची ''माई भिक्षा घाल, ओम् भवति भिक्षां देही''ची हाक ऐकू आली आणि तांदूळ निवडत बसलेल्या द्वारकामाई लगबगीनं उठल्या. त्यांनी स्वयंपाकघराच्या फडताळातून एक खडीसारखेचा खडा काढला. घाईघाईनं बाहेर येऊन तो सोपानाच्या हातावर ठेवला. इकडेतिकडे बघत कानोसा घेतला. आज श्रीधरपंत लवकर घरी येणार होते आणि त्यांची येण्याची वेळही झाली होती. त्यांची चाहूल घेऊन माईंनी तो खडीसाखरेचा खडा सोपानाच्या हातावर ठेवला. सोपानानं तो खांद्यावरच्या झोळीला असलेल्या छोट्या कप्प्यात टाकला आणि श्रधरपंत आले. माई दचकल्या. 'यांना कळलं की काय?' या शंकेनं त्यांचं मन धास्तावलं; पण सोपानाकडे न पाहता श्रीधरपंत आत गेले. पडवीत जाऊन त्यांनी वहाणा काढल्या. ग्रीष्म ऋतू होता. दुसरा प्रहर अजून सुरू व्हायचा होता, तोच उन्हाचा कडाका जाणवू लागला होता. वहाणा काढून पंत अंगणात आले. अंगणातली सारवलेली जमीनही तापली होती. डोणीतलं पाणी घेऊन त्यांनी हात-पाय धुतले, चेहऱ्यावर-माथ्यावर ते गार पाणी मारून घेतल्यावर त्यांना बरं वाटलं. सोग्याला तोंड पुसत ते आत आले. तोच माई माधुकरी घेऊन बाहेर आल्या. त्यांच्या हातात द्रोण होता. त्यात भात होता. पंतांकडे एक कटाक्ष टाकून त्या माधुकरी घालण्यासाठी दाराबाहेर आल्या. खाली वाकून, उंबऱ्यात उभ्या राहून सोपानाच्या झोळीत तो भात घालत असतानाच त्यांना तो भात आंबल्याचा, नासल्याचा वास आला; पण उशीर झाला होता. भात सोपानाच्या झोळीत पडला होता. त्या चरकल्या. त्यांच्या जिवाची घालमेल झाली. चेहऱ्यावर अपराधी भाव दाटून आले. डोळ्यांचे काठ पाण्यानं भरले. सोपानाच्या ते लक्षात आलं. खरंतर श्रीधरपंत आल्याचे बघून तो परत जाणार होता; पण श्रीधरपंतांनी त्याला बघूनही न बघितल्यासारखं केलं; पण त्यांच्या कपाळावर आठीही उमटली नाही. म्हणून तो थांबला ! पण माई भात घेऊन बाहेर आल्या म्हटल्यावर त्यानं झोळी पुढे कली. झोळीत भात ओतताना त्यालाही आंबूस वास आला; पण तो काही बोलला नाही; आता याही गोष्टीची सवय झाली होती. पण माईंच्या डोळ्यांत पाणी भरलेलं बघितल्यावर तो भांबावला. 'काय झालं? आपलं काहीतरी चुकलं का? पंतांसमोर आपण थांबायला नको होतं का?' असले प्रश्न त्याच्या मनात उभे राहिले; पण इतर काही न बोलता तो नुसता माईंकडे बघत उभा राहिला. त्याच्या मनांतले प्रश्न त्याच्या नजरेत उमटले होते. माईंनी ते वाचले. म्हणाल्या, ''बाळा, अरे भात आंबला आहे. पुढे गेला आहे. तू येणार म्हणून जेव्हा मी काढून ठेवला होता, तेव्हा तरी चांगला होता;

पण माझ्या हातून पाप घडलंय. तुला आंबलेला भात मी वाढला. मीच चुकले. तो तुझ्या झोळीत टाकण्याआधी मी पहायला हवं होतं ! आता काय करशील रे?'' भरल्या आवाजात माईंनी विचारलं. माईंच्या डोळे भरून येण्याचे कारण सोपानाला समजलं आणि त्यांच्या आवाजातून त्यांची मायाही समजली. सोपान म्हणाला, ''माई, वाईट वाटून घेऊ नका. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. ते ईश्वरासमान आहे –

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।**
**तदहं भक्त्युपहृतम्श्रामि प्रयतात्मन:।।**


म्हणजे पत्र, पुष्प, फल, जल इत्यादी हे जो भक्त मला प्रेमानं अर्पण करतो, त्या शुद्ध बुद्धीच्या, निष्काम प्रेम करणाऱ्या भक्तानं अर्पण केलेले ते पदार्थ मी सगुणरूपानं प्रकट होऊन प्रीतीनं ग्रहण करतो, असं प्रत्यक्ष भगवंतानं गीतेत सांगितलं आहे. माई, प्रेमानं अर्पण केलेली कोणतीही वस्तू जर प्रत्यक्ष ईश्वराला चालत असेल, तर ती मनुष्यप्राण्याला का चालू नये? आणि –

**अहे वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रित:।**
**प्राणापानसमायुक्त: पचाम्यन्नं चतुर्विधम्।।**

म्हणजे सर्व प्राणिमात्रांच्या देहामध्ये मी जठराग्नी होऊन प्राण व अपान यांच्या साहाय्यानं शुष्क, स्निग्ध, सुपक्व व विदग्ध या चार प्रकारचे अन्न पचवितो, असं जर प्रत्यक्ष परमेश्वर सांगतो आहे, तर या आंबलेल्या भाताची पत्रास ती काय? माई, तुम्ही नका वाईट वाटून घेऊ ! या भाताच्या स्थितीपेक्षा त्या पाठीमागची तुमची माया, तुमचं निष्काम प्रेम माझ्या दृष्टीनं लाखमोलाचं आहे. या तुमच्या वात्सल्यामुळे तो आंबलेला भातसुद्धा आमच्यासाठी केशरी–भात बनेल. माई, तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. मला विश्वास आहे की, त्या भाताच्या शितात तुमची माया भरलेली असेल. 'माई, चतुर्वेदान् षट्शास्त्राणि अष्टादश पुराणानि पठिता भवामि।।' माई, तुम्ही घातलेली ही भिक्षा मी चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे यांचं अध्ययन करण्याच्या कामी वापरणार आहे. येतो मी !'' असं म्हणून माईंना वंदन करून सोपान तिथून बाहेर पडला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे टक लावून बघणाऱ्या माईंच्या डोळ्यांतून पाणी ओघळत होतं, इकडे त्याचं लक्षचं नव्हतं ! पण पडवीतल्या झोपाळ्यावर येऊन बसलेल्या श्रीधरपंतांचं मात्र झाल्या प्रकाराकडे बारीक लक्ष होतं. सहज बोलता–बोलता, माईंची समजूत काढता–काढता हा सात–आठ वर्षांचा सोपान भगवद्‌गीतेतली उदाहरणं देऊन माईंना समजावून सांगत होता. श्रीधरपंत थक्क झाले. झोपाळ्यावरून उठून ते माईंजवळ आले. त्यांना पाहताच माईंनी घाईघाईने पदराला डोळे पुसले. चेहऱ्यावर कसनुसं हसू आणलं आणि खाली मान घालून त्या उभ्या राहिल्या; पण त्यांच्या चेहऱ्याकडे न बघता सोपान गेला त्या दिशेकडे बघत श्रीधरपंत उद्‌गारले, ''द्वारके, आपल्या पोटी पुत्र येणारच असेल, तर तो या सोपानासारखा येवो, असं मी देवाकडे साकडे घालेन !'' त्यांच्या या उद्‌गारासरशी द्वारकामाईंनी चमकून पंतांकडे पाहिलं आणि त्यांना गलबलून आलं. पदराचा बोळा तोंडात कोंबत, हृदयातून आलेला उमाळा कोंडत त्या आत गेल्या. पंत मात्र सोपान गेला, त्या दिशेकडे बराच वेळ बघत बसले होते. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००


**दिनविशेष**
**(सप्टेंबर २०२३)**
**नि. श्रावण - भाद्र. १९४५**
**शोभननाम संवत्सरे**



**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**


**रविवार दि. ३ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.२०), **सोमवार दि. ४ :** श्री टेंब्येस्वामी जयंती, **मंगळवार दि. ५ :** शिक्षक दिन, **बुधवार दि. ६ :** श्रीकृष्ण जन्माष्टमी, **गुरुवार दि. ७ :** गोपाळकाला, संत ज्ञानेश्वर माऊली जन्माष्टमी, पंत बाळेकुंद्री महा. जयंती, **शुक्रवार दि. ८ :** साक्षरता दिन, **शनिवार दि. ९ :** श्रीकृष्ण सरस्वती महा.पुण्यतिथी, **सोमवार दि. ११ :** स्वामी स्वरुपानंद पुण्यतिथी, **गुरुवार दि. १४ :** मातृदिन, हिंदी दिन, **शुक्रवार दि. १५ :** अभियंता दिन, **मंगळवार दि. १९ :** गणेश चतुर्थी, **बुधवार दि. २० :** ऋषि पंचमी, गजानन महा.पुण्यतिथी, **शुक्रवार दि. २२ :** ज्येष्ठा गौरी पूजन, **शनिवार दि. २३ :** गौरी गणपती विसर्जन, विषुव दिन, **रविवार दि. २४ :** हृदयविकार जागृकता दिन, **बुधवार दि. २७ :** पर्यटन दिन, **गुरुवार दि. २८ :** अनंत चतुर्दशी, कर्णबधीर दिन, **शुक्रवार दि. २९ :** महालयारंभ.

## ‘नवस्नेह’ मासिकाचे संपादकीय सल्लागार ताम्हनकर काका अनंतात विलीन !

# भावपूर्ण श्रद्धांजली !



**जो आवडतो सर्वांना,**

**तोचि आवडे देवाला**

हे गाणं लहानपणी ऐकलं होतं, पण त्याचं प्रत्यंतर असं मोठेपणी वारंवार येईल असं वाटलं नव्हतं. कानिटकर काका गेले तेव्हाही ते आलं... आणि आता पुष्कर ताम्हनकर गेले तेव्हाही...

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणी ।**

**नैनं दहति पावका: ।।**

हे आत्म्याचं वर्णन कितीही खरं असलं तरीही हा आत्मा स्नेहाच्या चार गोष्टी बोलू शकत नाही. ताम्हनकर काका म्हणजे स्नेहाचा अखंड झरा होता. कधीही, कुठंही भेटले तरी. आपली प्रकृती कशीही असली तरीही ‘तुम्ही कशा आहात?’ हे आधी विचारणार. नवस्नेहचे तर ते संपादकीय सल्लागार होते. त्यामुळे नवस्नेहमध्ये काय यावं, काय नाही याचा सतत विचार.

माझं ‘रंग पश्चिमा’ हे प्रवास वर्णन त्यांना इतकं आवडलं, की मला न सांगता त्यांनी ते नवस्नेहमध्ये घ्यायला लावला. अर्थात तो प्रेमाचा अधिकार होता. तत्परता हा त्यांचा एक अनुकरणीय स्वभाव. काही सांगितलं की त्याची अंमलबजावणी त्वरीत व्हायची. मला वाटतं बँकेत नोकरी केल्याचा हा परिणाम असावा. तिथंही त्यांनी खूप नाव कमावलं होतं. प्रकृती अस्वस्थ्यामुळं ते हल्ली नवस्नेहचं काम फारसं बघत नसतं. पण तरीही फोन असायचे. आणि फोनवरूनही शाब्बासकी असायची. आपल्या नवस्नेहच्या परिवारातला एक खंदा कार्यकर्ता आणि सल्लागार अनंताच्या प्रवासाला निघून गेला ! आम्ही आमच्या एका उत्कृष्ट सहकाऱ्याला मुकलो !

नवस्नेह परिवार, कोल्हापूर चित्पावन संघ, परशुराम पतसंस्था यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवो आणि ताम्हनकर काकांच्या आत्म्याला चिर:शांती लाभो, ही ईशचरणी प्रार्थना !!



## परिचय

**(कै. गं भा. सरस्वती विनायक व कै. विनायक नारायण जोशीराव यांचे स्मरणार्थ जोशीराव कुटुंबियांच्या सहकार्याने पत्रकार सन्मान)**

# माननीय ओंकार चंद्रशेखर धर्माधिकारी

**नांव** **श्री. ओंकार चंद्रशेखर धर्माधिकारी**
**शिक्षण** एम.ए.(एम.सी.जे.), गरवारे कॉलेज, पुणे.
**व्यवसाय** पत्रकारिता

सन २०११ मध्ये 'लोकसत्ता' दैनिकात विद्यार्थी बातमीदार म्हणून पत्रकारितेची सुरुवात. त्यानंतर साप्ताहित विवेक, लोकप्रभा, चित्रलेखा या नियतकालिकांमध्ये मुंबई येथे काम केले. नियतकालिकांच्या माध्यमातून विविध सामाजिक, आर्थिक विषयांवर लेखन. २०१४ ते २०१७ मध्ये कोल्हापुरात दै. तरुण भारत मध्ये बातमीदार म्हणून काम केले. गेली सहा वर्षे दै. सकाळमध्ये बातमीदारी करीत आहे. या कालावधीत विविध सामाजिक विषयांवर सातत्याने लेखन. पंचगंगा नदी प्रदूषण, जिल्ह्यातील जैवविविधता, विविध नागरी आणि सामाजिक प्रश्न यांवर आजपर्यंत विपुले लेखन केले आहे. आकाशवाणीवरही काही कार्यक्रम सादर केले आहेत. दै. सकाळ कडून प्रकाशित करण्यात आलेला कोल्हापूर सांगली महापुराबाबतचा अहवाल बनवण्यामध्ये सहभाग.

कोल्हापुरातील साहित्यिकांवर आधारलेले 'साहित्यिकांच्या पाऊलखुणा' या सदराचे वर्षभर लेखन केले. ग्रामीण विकास आणि सहकार या विषयांवर दिवाळी अंक आणि पुरवण्यांमध्ये नियमित लेखन केले. सकाळ साप्ताहिकातही लेख प्रकाशित झाले आहेत.

---



## परिचय

**(कै. सरस्वती गणेश गोखले यांचे स्मृतिप्रित्यर्थ कै. भाऊकाका व गोखले कुटुंबियांच्या सहकार्याने आदर्श माता सन्मान)**

# सौ. उज्वला प्रताप चिपळूणकर

सौ. उज्वल प्रताप चिपळूणकर या पूर्वाश्रमीच्या उज्वला नारायण दातार भिवंडी, जि. ठाणे येथे दि. २१ सप्टेंबर १९५३ रोजी त्यांचा जन्म झाला. दातार महाविद्यालय, चिपळूण येथून कला शाखेअंतर्गत पदवी शिक्षण पूर्ण झाल्यावर कोल्हापूर येथील श्री. प्रताप रघुनाथ चिपळूणकर यांच्याशी दि. ४ मार्च १९७६ रोजी त्या विवाहबद्ध झाल्या. १५ जणांच्या एकत्र कुटुंबात त्या वावरल्या. एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन अपत्ये पैकी मुलगी सूक्ष्म जीवशास्त्रात पदव्युत्तर तर मुलगा बी.ए. व मुक्त विद्यापीठातून कृषी पदवीधर झाला आहे. घरची शेती असलेने शेतकरी नवरा व पुढे शेतकरी सुपुत्र अशी परंपरा आहे. मुलांचे शिक्षण व्यवस्थित व्हावे यासाठी त्यांनी आपल्या मुलांबरोबर काही विद्यार्थी, मित्र-मैत्रिणींसाठी घरातच शिकवण्या घेणे चालू केले. त्याचा त्यांच्या दोन्ही मुलांना अभ्यासात खूपच फायदा झाला. ३०-३५ वर्षांपूर्वी चित्पावन संघ, कोल्हापूरचे सभासदत्व घेऊन संघाच्या कार्यात त्या सक्रीय कार्यरत राहिल्या. संघाच्या सर्वच उपक्रमांत सुरुवातीपासून त्या सहभाग देत आहेत. वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची माहिती अभ्यासून ते तयार करणे, शिवणकाम, विणकाम, भरतकाम, संकांतीचे दागदागिने करणे व काही ग्राहोकोपयोगी पदार्थ करून शक्य होईल त्याप्रमाणे त्यांची विक्री करणे असे छंद त्यांनी जोपासले आहेत.




परिचय

(कै. गं भा. सरस्वती विनायक व कै. विनायक नारायण जोशीराव यांचे स्मरणार्थ जोशीराव कुटुंबियांच्या सहकार्याने पत्रकार सन्मान)

# माननीय अश्विनी टेंबे - दफ्तरदार

पत्रकार, नाटककार, निवेदिका, कंटेन्ट रायटर असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व. नवे काही शिकण्याची उर्मी. ते साध्य होईपर्यंत श्रम घेण्याची तयारी या गुणांमुळे त्यांनी विविध क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविला. वृत्तपत्र, रेडिओ, रंगमंच, सोशल मिडिया, ब्लॉग, वेब पोर्टल, युट्युब अशा सर्वच क्षेत्रात त्यांचा सहजगत्या होणारा वावर त्यांच्यातील आत्मविश्वासाचे दर्शन घडवितो. संवाद साधण्याचे त्यांचे कौशल्य माणूस जोडणारेच नाही, तर माणसाला बोलते करणारे आहे. त्यातूनच एक उत्तम मुलाखतकार म्हणून त्यांची ओळख झालेली आहे. त्यांना सातत्याने नवे विषय मिळाले. लेखणीला धार आली. उत्कृष्ट पत्रकार म्हणून त्यांचा दबदबा वाढला. वृत्तपत्रासाठी लेखन करताना त्यांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषय मोठ्या ताकदीने हाताळले. पत्रकारितेचा वारसा त्यांना त्याचे आजोबा, सांगलीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. भगवंत अंबाजी ऊर्फ बापूसाहेब दफ्तरदार यांचेकडून मिळाला. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या आयुष्यावर, कार्यावर एक स्मरणिका प्रकाशित करून अश्विनी यांनी त्यांच्या पत्रकारितेची सुरुवात केली. घरातच पत्रकारितेचे बाळकडू मिळालेल्या अश्विनी यांनी कला शाखेची पदवी घेऊन मास्टर ऑफ जर्नालिझम पूर्ण केले. त्यानंतर सांगलीमध्ये दै. लोकमत, गोवा येथे असताना गोवा लोकमत आणि आता दै. केसरी कोल्हापूर येथे त्या कार्यरत आहेत. बातमीदारीपासून कार्यालय प्रमुख पदापर्यंत त्यांची वाटचाल ही त्यांचे कर्तृत्व दाखवणारी आहे. दै. लोकमत आणि दै. तरुण भारत मध्ये सुरुवातीला त्यांनी कॅम्पेनिंगदेखील केलेले आहे. मिरजेमध्ये त्यांचे वडील सुधीर दफ्तरदार यांची महाराष्ट्र टाईम्सची एजन्सी होती. दुकानात सर्व वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके, मासिके अशी वाचनसंपदा मुबलक प्रमाणात उपलब्ध होती, ज्याचा त्यांनी स्वत:च्या विकासासाठी उपयोग करून घेतला. पत्रकारितेसाठी त्यांना गुरु-शिष्य परंपरेतील व्यंकटेश चपळगावकर फौंडेशनचा 'उपक्रमशील महिला पत्रकार', विश्वसंवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'देवर्षी नारद पुरस्कार' यांच्या त्या मानकरी ठरल्या आहेत.

पत्राकारितेत आलेले अनुभव, भेटलेली माणसं यातून त्यांनी लिहिलेल्या बातम्या, स्तंभलेखन हे अनेक प्रश्नांना वाचा फोडणारे ठरले, संग्राह्य ठरले. महिलांच्या हिमतीचे दर्शन घडवणाऱ्या स्तंभलेखनातून 'आव्हान पेलताना' हे त्यांचे पहिले पुस्तक साकारले. त्या पुस्तकाला दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेसह अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. तर 'सुटका' या त्यांच्या पहिल्या नाटकाने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. इतका व्याप असूनही त्यांनी 'संगीतायन' या ग्रुपच्या निवेदनाची जबाबदारी स्वीकारली. संहिता लेखनापासून सादरीकरणा पर्यंत सगळे समर्थपणे पेलले. आता त्या कथ्थक नृत्याचे प्रशिक्षण घेत आहेत. त्यांचे आई, वडील, पती, सासूबाई यांच्या पाठिंब्यामुळे अश्विनी टेंबे सक्षमपणे काम करीत पुढेच जात आहेत. हे सगळे करताना एक मुलगी, सून, पत्नी, आई या नात्यातील आस्थाही त्यांनी तितक्याच ताकदीने सांभाळली आहे. घरट्याच्या बळावरच त्यांनी आसमंतात उत्तुंग भरारी घेतली आहे. त्यांची ही झेप पाहता त्यांचे आभाळ असीम असल्याचे दिसते !



परिचय

**(कै. वे.मू. श्रीपाद काळे, वाडा यांचे स्मृतिप्रीत्यर्थ**
**सौ. व श्री. वामन काळे, सांगली यांच्या सहकार्याने वैदिक सन्मान)**

# वेदशास्त्रसंपन्न श्री. मुकुंद दत्तात्रय केळकर गुरुजी, कोल्हापूर.

मुकुंद दत्तात्रय केळकर गुरुजी, यांचा जन्म दि. ५/१०/१९६१ रोजी कोल्हापूर येथे झाले. शालेय शिक्षण १० पर्यंत विद्यापीठ हायस्कूल येथे पूर्ण झाल्यानंतर याज्ञिक शिक्षण संकेश्वर जवळ सोलापूर येथे वे.मू.बाबूराव जोशी यांच्याकडे पाच वर्षे राहून पूर्ण केले. आजोबांच्यापासून वडील मधुशास्त्री केळकर यांनी याज्ञिक शिक्षण पूर्ण केले आणि हीच परंपरा पुढे मुकुंद केळकर गेली ४० वर्षे सांभाळत आहेत.

धार्मिक कृत्य हे यजमान व उपाध्ये यांचे समाधानाने करून त्या धर्मभावना व देवतेच्या आशीर्वादाने त्यांची मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवतेला प्रार्थना, आवाहन करून ईश्वराची कृपादृष्टी कर्मकर्त्याला प्राप्त होण्यासाठी व त्याच्या कल्याणासाठी देवतेला विनंती करणे हाच गुरुजींचा ध्यास असणे महत्त्वाचे असते. यालाच ईश्वर आणि यजमान या दोघांत श्रद्धेचा सेतू बांधणे असेच म्हणावे लागेल. केळकर घराण्यात हे महत्त्वाचे कार्य गेली तीन पिढ्या सुरू आहे. मुकुंद केळकर यांचे आजोबा कै. गोपाळ भटजी केळकर हे कर्नाटकातील जमखंडी या गावचे. चरितार्थासाठी कोल्हापुरात आले. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत श्री देवीचा अभिषेक व नैवेद्य करून त्यांनी या व्यवसायात मोठ्या कष्टाने जम बसविला. त्यांचे तीन सुपुत्रही आपापल्या परीने या व्यवसायात त्यांना साहाय्य करीत राहिले. श्री. मधुकाका केळकर यांनी वे.मू.श्री. मंगसुळीकर गुरुजी यांच्याकडे वेदविद्येचे शिक्षण घेतले. याज्ञिकीचे शिक्षणही घेतले. त्यावेळी त्यांचे सोबत मधुकाक शुक्ल व पंचागकर्ते नाना लाटकर हे सहाध्यायी होते. लोक त्यांना मधुशास्त्री म्हणून ओळखत असत. अत्यंत नम्रपणा आणि साधेपणा हे त्यांचे सद्‌गुण. शास्त्रशुद्ध पद्धतीने धार्मिक विधी करून त्यांनी लोकांमध्ये धार्मिकतेची आवड निर्माण केली. वयाच्या २० व्या वर्षापासून ८० व्या वर्षापर्यंत अखंडपणे ६० वर्षे पौरोहित्य केले. १९८३ पासून मुकुंद केळकरांनी वडिलांची आणि घराण्याची ही पौरोहित्याची परंपरा पुढे नेली आहे. कोल्हापुरात जगदंबेच्या कृपेने व सर्वच आदरणीय यजमानांच्या प्रेमाने व लोभाने ही परंपरा कायम राखणे त्यांना शक्य झाले आहे. जगदंबेची अशीच कृपा आपणांवर कायम राहावी आणि लोकांचे धार्मिक कार्यक्रम श्रद्धेने आणि सुबुद्धीने आमच्याकडून कायम होत रहावे, असे त्यांना वाटते.

# औक्षण

औक्षण शब्दात 'औक्ष' (आयुष्य) हा शब्द दडलेला आहे. त्यामुळे या प्रथेचा दीर्घायुष्याच्या कामनेशी संबंध आहे.

भाऊबीज, राखीपौर्णिमासारखे सण सोडले तर बहुतेक वेळी आई/आजी मुलांचे औक्षण करते.

औक्षण ही एक क्रिया आहे आणि ती करण्यासाठी एका ताम्हणात हळद-कुंकू, अक्षता, तेवते नीरांजन, सुपारी, अंगठी वगैरे गोष्टी असतात.

औक्षण करणे किंवा ओवाळणे हा हिंदु धर्मात शुभप्रसंगी सांगितलेला छोटासा; पण महत्त्वाचा विधी आहे. वाढदिवस, रक्षाबंधन, भाऊबीज,, परदेशगमन, परीक्षेतील यश, युद्धात विजयी होणे अशा शुभप्रसंगी त्या त्या व्यक्तीला ओवाळून शुभेच्छा देण्याचा हा विधी आहे. त्या विधीविषयी जाणून घेऊया !

**'औक्षण' या शब्दाचा आध्यात्मिक अर्थ काय ?**

'औक्षण' म्हणजे दिव्याच्या ज्योतीच्या साहाय्याने कार्यरत झालेल्या ब्रह्मांडातील देवतांच्या लहरी पृथ्वीवर येण्याच्या क्षणाचे स्वागत करणे आणि तो क्षण टिपून त्याच वेळी त्या लहरींना शरण जाणे.

**औक्षण करण्याचे महत्त्व काय ?**

**अ) संरक्षक-कवच निर्माण होणे**

औक्षण करतांना तबकातील दिव्याच्या साहाय्याने प्रक्षेपित होणार्या किंवा ग्रहण केल्या जाणार्या लहरींचे, औक्षण करवून घेणार्या जिवाच्या देहाभोवती गतीमान संरक्षक-कवच निर्माण होते.

**आ) देवतेचा आशीर्वाद मिळण्यास साहाय्य होणे**

औक्षण करतांना देवतांना शरण जाऊन स्वतःची आध्यात्मिक उन्नती होण्यासाठी प्रार्थना केल्यानेच अपेक्षित फलनिष्पत्ती होण्यास साहाय्य होते आणि खर्या अर्थाने औक्षणकर्माचे उद्दिष्ट साध्य होते, म्हणजेच औक्षणाच्या माध्यमातून देवतेचा आशीर्वाद मिळण्यास साहाय्य होते.'

**औक्षण कोणाचे करावे ?**

लहान मूल, संस्कार्य व्यक्ती, स्वागतमूर्ती, युद्धावर निघालेला सैनिक, राजा आणि संत यांचे औक्षण करावे.

**औक्षण कोठे करावे ?**

सर्वसाधारणतः ज्याचे औक्षण करायचे आहे त्याला घरात देवापुढे बसवून त्याचे औक्षण करावे. विशेष कार्य (उदा. मुंज, लग्न इत्यादी) असल्यास त्या कार्यस्थळी औक्षण करावे.

**औक्षण दारात न करता वास्तूच्या आतमध्ये का करावे ?**

'दाराचा उंबरा हे पाताळातून प्रक्षेपित होणार्या त्रासदायक लहरी ग्रहण करण्याचे आणि त्या पुन्हा पाताळात संक्रमित करण्याचे उत्तम माध्यम आहे. दाराच्या चौकटीमध्ये या त्रासदायक लहरी घनीभूत झालेल्या असतात. दारात उभे राहिल्याने या रज-तमात्मक लहरींनी भारित क्षेत्राचा जिवाला त्रास होतो. जिवाभोवती या त्रासदायक लहरींचा कोश निर्माण होतो. याचा जिवाच्या मनोमयकोशावर परिणाम होऊन तेथील रज-तम कणांचे प्राबल्य वाढल्याने जीव चिडचिडा बनतो. या कारणास्तव दारात औक्षण करणे, हे हिंदु धर्माला संमत नाही. दारात औक्षण करण्यापेक्षा दाराच्या आतल्या भागात, म्हणजेच वास्तूत, शक्यतो देवघरासमोर औक्षण करावे. देवघरासमोर रांगोळीचे स्वस्तिक काढून त्यावर पाट मांडून मगच औक्षण करावे. असे केल्याने देवतेचे वातावरणातील चैतन्य जिवाच्या भावामुळे कार्यरत होऊन त्याचा जिवाला अपेक्षित लाभ मिळण्यास आणि त्याला पुढील कार्यास अपेक्षित असे देवतेचे आशीर्वादरूपी बळ मिळण्यास साहाय्य होते.'

(व्यक्तीला वाईट शक्तींचा त्रास असल्यास तो दूर करण्यासाठी तिची मीठ-मोहरी आणि लाल मिरच्या यांनी दृष्ट काढतात, तसेच तिच्यावरून नारळ ओवाळतात. दृष्ट दारात काढतात आणि ओवाळलेला नारळ उंबरठ्याबाहेर फोडतात. उंबरठा हे त्रासदायक लहरी पाताळात संक्रमित करण्याचे उत्तम माध्यम असल्याने असे करतात.)

**औक्षण करण्यासाठी लागणारे साहित्य :**

हळद-कुंकू, अक्षता, कापसाच्या वाती, तेल, निरांजन, सोन्याची अंगठी, पूजेची सुपारी इत्यादी.

१. अंगठी आणि सुपारी हे प्रत्यक्ष कार्य करणार्या

**(पुढील मजकूर पान २२ वर पाहा...)**

# असाही एक सफाई कर्मचारी

## (एका असामान्य भारतीयाला माझा सॅल्यूट !)

१९९८ सालची गोष्ट. क्षेपणास्त्रे (मिसाईल) बनवण्यासाठी भारताचे जोरदार प्रयत्न चालू होते. अमेरिकेच्या उपग्रहांना सुगावा लागू नये म्हणून क्षेपणास्त्रांच्या प्रकल्पाबाबत कमालीची गुप्तता राखली जात होती. क्षेपणास्त्रांकरिता आवश्यक असलेली क्रायोजेनिक इंजिन्स गुप्तपणे चेन्नई बंदरामध्ये आणली जात होती. तेथून ती इंजिन्स हवाई मार्गाने पुढे नेण्याची योजना होती. त्यासाठी भारतीय वायुसेनेची हेवी लिफ्ट हेलिकॉप्टर्स वापरली जाणार होती.

चेन्नई बंदरापासून क्षेपणास्त्रांच्या लाँच पॅडपर्यंत पोहोचण्याकरता हेलिकॉप्टरला दोन तास पुरेसे होते. परंतु, अमेरिकेच्या उपग्रहांना चकवण्यासाठी, नागमोडी मार्गाने उडत, आणि चार वेगवेगळ्या ठिकाणी दोन-दोन तास थांबे घेत जाण्याचे आदेश हेलिकॉप्टर्सच्या वैमानिकांना दिले गेले होते. त्यामुळे, प्रत्यक्षात दोन तासांचा असलेला प्रवास आम्ही सोळा तासांमध्ये पूर्ण करणार होतो. अर्थात, आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांबाबत गुप्तता राखण्यासाठी मोजली जाणारी ही किंमत अगदीच नगण्य होती.

हेलिकॉप्टरमध्ये वजनदार क्रायोजेनिक इंजिने ठेवलेली असल्याने, प्रवासी क्षमतेवर खूपच मर्यादा आली होती. क्षेपणास्त्र प्रकल्पाचे फक्त १२ कर्मचारीच एकावेळी इंजिनसोबत प्रवास करू शकणार होते. या १२ कर्मचाऱ्यांमध्ये दोन सफाई कामगारांचाही समावेश होता. त्याचे कारण असे की, क्रायोजेनिक इंजिनमधून सतत गळून  हेलिकॉप्टरमध्ये सांडणारे तेल व क्रायोजेनिक इंधन वेळोवेळी स्वच्छ करत राहणे आवश्यक होते.

भारत सरकारच्या सर्वोच्च पातळीवर ज्यांची नावे मंजूर झालेली होती अशा कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त कोणालाही हेलिकॉप्टरमध्ये प्रवेश देऊ नये असे स्पष्ट आदेश आम्हाला होते. परंतु, सफाई कामगारांपैकी एखादा कामगार बदलून त्याच्या जागी ऐनवेळी दुसरा कामगार नेमण्याचे अपवादात्मक विशेषाधिकार क्षेपणास्त्र प्रकल्प निदेशकांना दिलेले होते. मात्र त्यासाठी प्रकल्प निदेशकांची लेखी परवानगी त्या कामगाराच्या हातात असणे आवश्यक होते.

चेन्नईहून आम्ही निघण्याच्या तयारीत होतो. इतक्यात, भुरकट लांब केस असलेला एक माणूस आमच्यापाशी येऊन म्हणाला, मला लाँच साईटवर पोहोचणं अत्यावश्यक आहे, पण माझी फ्लाईट चुकलीय. मला तुमच्यासोबत जाण्याशिवाय पर्याय नाही. प्लीज मला घेऊन चला.

आमच्या हेलिकॉप्टरमध्ये प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त एकही जादा मनुष्य आम्ही सोबत नेऊ शकणार नव्हतो. त्यामुळे आमच्यापाशीही त्याला नकार देण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता.

आम्ही अगदी उड्डाण करण्याच्या तयारीत असताना तो मनुष्य पुन्हा आमच्यापाशी धावत-धावत आला आणि म्हणाला, हे पहा, माझ्यापाशी प्रकल्प निदेशकांचे लेखी परवानापत्र आहे. अमुक-अमुक सफाई कामगाराच्या ऐवजी मला जागा दिली गेली आहे.

आता काहीच हरकत नसल्यामुळे, मुख्य वैमानिकाने त्याला चढायची परवानगी दिली. एखाद्या लहान मुलाप्रमाणे आनंदाने उडी मारून तो मनुष्य हेलिकॉप्टरमध्ये चढला.

आमच्या प्रवासाचा एक टप्पा पूर्ण करून आम्ही एके ठिकाणी थांबलो होतो. चार तासांचा हॉल्ट होता. आम्ही निवांत चहा पीत बसलो होतो. तिथूनच आम्हाला दिसले की तो मनुष्य हेलिकॉप्टरचा अंतर्भाग अगदी काळजीपूर्वक पुसून काढत होता. आमच्यासोबतच्या कर्मचारीवर्गात काही वरिष्ठ शास्त्रज्ञ देखील होते. ते त्या माणसाशी काहीतरी बोलत असल्याचे आम्हाला दिसले.

इतक्यातच एक शास्त्रज्ञ धावत आमच्यापाशी आला आणि म्हणाला, अहो, ते जे हेलिकॉप्टर स्वच्छ करतायत त्यांना प्लीज थांबवा. ते आमचं ऐकत नाहीयेत. ते स्वतःच आमच्या क्षेपणास्त्र प्रकल्पाचे निदेशक आहेत, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम!

हे ऐकून आम्हाला धक्काच बसला. आमच्या

मुख्य वैमानिकाने लगेच जाऊन त्यांना ते काम थांबवण्याची विनंती केली. त्यावर हसून ते इतकेच म्हणाले, मी या हेलिकॉप्टरमध्ये एक सफाई कामगार म्हणून प्रवास करत आहे. माझे कर्तव्य बजावण्यापासून तुम्ही कृपया मला रोखू नका.

आमचा नाईलाज झाला. त्यापुढच्या हॉल्टमध्येही या सद्गृहस्थांची कर्तव्यपूर्ती अव्याहत चालू राहिली. अक्षरशः हतबुद्ध होऊन पाहत राहण्यापलीकडे आम्ही काहीच करू शकत नव्हतो.

गंतव्यस्थानी पोहोचल्यानंतर आम्ही या अजब प्रकल्प निदेशकाचा आणि त्याच्या टीमचा हसतमुखाने निरोप घेतला.

या घटनेनंतर बर्‍याच वर्षांनी मला राष्ट्रपती भवनातून एक निमंत्रणपत्र आले. राष्ट्रपतींनी तेथील 'मुघल गार्डन्स' चा केलेला कायापालट मी पाहावा आणि राष्ट्रपती एक सफाई कामगार म्हणून चांगले आहेत की ते त्याहून अधिक चांगले माळी आहेत हे मी सांगावे, असे त्या पत्रात लिहिले होते!

त्या काळी मी परदेशात असल्याने, आमंत्रण स्वीकारू शकत नसल्याचे मी विनम्रतापूर्वक कळवले.

कालांतराने, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची मी आवर्जून भेट घेतली. तेंव्हाही त्यांनी खळखळून हसत त्या जुन्या प्रसंगाची आठवण जागवली.

एका असामान्य भारतीयाला माझा सॅल्यूट !

मूळ इंग्रजी अनुभव लेखक :
**विंग कमांडर अब्दुल नासिर हनफी,**
वीर चक्र, सेवानिवृत्त
मराठी भावानुवाद : **कर्नल आनंद बापट,**
सेवानिवृत्त

# औक्षण (पान नं. २० वरून पुढे...)

शिवाचे (पुरुषतत्त्वाचे) प्रतीक म्हणून आपल्या उजव्या बाजूला ठेवावे.

२. अक्षता या सर्वसमावेशक असल्याने त्यांना मध्यभागी, म्हणजेच तबकाच्या केंद्रबिंदूच्या ठिकाणी स्थान द्यावे.

३. अक्षतांच्या थोडेसे पुढे; परंतु मध्यभागी दीपाला स्थान द्यावे. दीप हा जिवाच्या आत्मशक्तीच्या बळावर कार्यरत होणार्या सुषुम्नानाडीचे प्रतीक आहे. हळदकुंकवाच्या माध्यमातून आदिशक्तीची, तर अंगठी आणि सुपारी यांच्या माध्यमातून शिवाची जोड मिळाल्याने देवतांकडून येणार्या आशीर्वादात्मक लहरी अक्षतांकडून जिवाकडे संक्रमित होण्यास साहाय्य झाल्याने, दीपाच्या माध्यमातून कार्यरत झालेल्या सुषुम्नानाडीमुळे जिवाने हाती घेतलेले कार्य देवतेच्या कृपेने सफल होते. अशा प्रकारे तबकातील घटकांची योग्य मांडणी केल्याने जिवाला देवतेच्या तत्त्वाचा अधिक लाभ मिळतो.'

औक्षण करण्यासाठी घ्यावयाच्या तबकात 'हळद-कुंकू आपल्या डाव्या बाजूला ठेवावे', असे दिले आहे, तर 'पूजेच्या तबकातील घटकांची मांडणी' यात 'हळद-कुंकू आपल्या उजव्या बाजूला ठेवावे', असे दिले आहे.

**या दोन्हींचा समन्वय कसा साधायचा ?**

पूजेच्या तबकातील घटकांची मांडणी ही पूजेच्या वेळी ते ते तत्त्व आकृष्ट करून पूजास्थळ शुद्ध करण्याच्या उद्देशाने व्यापक भावाच्या स्तरावर दिलेली आहे. यात तबकामध्ये समाविष्ट घटक हे रंग आणि गंध कण यांच्याशी संबंधित असल्याने या सर्वांमध्ये शक्तीवर्धक कार्यकारी रजोगुणी सगुणत्व त्यातल्या त्यात हळद-कुंकू यांच्याकडे संक्रमित झाल्याने त्यांना जिवाच्या उजव्या बाजूला स्थान दिले आहे, तर कनिष्ठ स्तरावरील औक्षणाच्या तबकात सुपारी आणि अंगठी या घटकांचा समावेश झाल्याने ते ते कार्यत्व हळद-कुंकू या घटकांपेक्षा कनिष्ठ स्तरावर कार्य करणार्या रजोगुणाकडे संक्रमित झाल्याने हळद-कुंकू जिवाच्या डाव्या बाजूला सरकवून अंगठी अन् सुपारी या प्राबल्याने कार्यरत असणार्या रजोगुणी घटकांना जिवाच्या उजव्या बाजूला स्थान दिले आहे. त्या त्या विधीतील कार्यरत रजोगुणी उद्देशाप्रमाणे तो तो घटक जिवाच्या उजव्या किंवा डाव्या बाजूला दर्शवला आहे.

**संकलन : सतीश अलोणी**

## ।। श्रीकृष्णाची आरती ।।

ओवाळूं आरती मदनगोपाळा । श्यामसुंदर गळा वैजयंतीमाला ।।धृ.।। चरणकमल ज्याचे अति सुकुमार । ध्वजवज्रांकुश ब्रीदाचे तोडर ।। ओवाळू ।।१।। नाभिकमल ज्याचें ब्रह्मयाचे स्थान । हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ।। ओवाळू ।।२।। मुखकमल पाहतां सुखाचिया कोटी । वेधलें मानस हारपली दृष्टी ।। ओवाळूं ।।३।। जडित मुगुट ज्याचा देदीप्यमान । तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ।। ओवाळूं ।।४।। एकाजनार्दनीं देखियलें रुप । रूप पाहता जाहलें अवघे तद्रूप ।। ओवाळूं ।।५।।

### योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा. **सौ. सिद्धी बकरे – 8275606627, श्री. रोहित गवळी – 9657963475**

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**सोमवार, दि. 11 सप्टेंबर 2023 : पुष्य नक्षत्र**

आपलं दुकान
**महाद्वार रोडवर,**
0231–2546585


## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**– अध्यक्ष**

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर
# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२३-२०२४
**(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)**
## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**

मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक.

१२. **इ.४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय) – अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation)

१८. गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी – इ. १० व १२ वी

१९. **इतर –** वक्तृत्व,संगीत, पाककृती

२०. **पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - सप्टेंबर २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मिनल B +ve | कोकणस्थ | १४/५/२००० ५.२ | वत्स, कन्या हस्त, तिसरे, आद्य, देवगण | M.Sc. Kathak Visharad | खाजगी नोकरी | वा.प्रा. २ लाख | वासुदेव विनायक सोवनी विष्णू गल्ली, तासगांव, जि.सांगली ९८२२८५६९६६ |
| २. | गौरी --- | देशस्थ | १४/९/९८ ५.२ | गौतम, मिथुन आर्द्रा, २ रे आद्य, मनुष्य | B.Com. M.B.A. | खाजगी नोकरी कोल्हापूर | --- | सुनिल द. नाडगौडा मु.पो.कोल्हापूर ८९९९९३४६३८ |
| ३. | प्रिया A +ve | देशस्थ | ३/८/९८ ५.१ | जमदग्नी, वृश्चिक अनुराधा, ४ थे मध्य, देवगण | B.Com. जर्मन भाषा C 1 Level | खाजगी नोकरी पुणे | वा.प्रा. ५.२० लाख | शैलेश श्रीधर कुलकर्णी राजोपाध्ये रोड, कोल्हापूर ७०५७०७९४४८ |
| ४. | ऋतुजा O +ve | कोकणस्थ | ९/९/९७ ५ फूट | अत्री, वृश्चिक अनुराधा, द्वितीय मध्य, देव | Master in Physio. Artho. | खाजगी नोकरी सांगली | वा.प्रा. ४.२० लाख | अनिरुद्ध श्रीरंग फडके सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ९४०३८६१४२० |
| ५. | अंकिता B +ve | कोकणस्थ | २३/६/९६ ५.७ | गार्ग्य, सिंह, उत्तरा, प्रथम आद्य, मनुष्य | B.E. C.S. | खाजगी नोकरी पुणे | वा.प्रा. १२ लाख | अनिल विनायक जोशी हस्तिनापूर नगरी, कोल्हापूर ९४२१२००१६४ |
| ६. | श्रद्धा A +ve | देशस्थ | ७/८/९६ ५.२ | भारद्वाज, वृषभ कृतिका, चतुर्थ अंत्य, राक्षस | B.E. | खाजगी नोकरी पुणे | वा.प्रा. ६ लाख | शरदचंद्र बा. पाटील राजारामपुरी, कोल्हापूर ९८५००४५५१४ |
| ७. | डॉ.वैजयंती B +ve | देशस्थ | १८/४/९५ ५.२ | गार्ग्य, वृश्चिक ज्येष्ठा, चौथे आद्य, राक्षस | BAMS | खाजगी नोकरी कोल्हापूर | वा.प्रा. २ लाख | विवेक वामन बागेवाडी कोल्हापूर. ९८२२६९०८३५ |
| ८. | डॉ. लेखा O +ve | कोकणस्थ | २०/५/९४ ५.४ | भारद्वाज, सिंह पूर्वा, चौथे मध्य, राक्षस | B.H.M.S. M.B.A. | कुडाळ येथे नोकरी | वा.प्रा. ३ लाख | सदानंद विठ्ठल रानडे पिंगुळी, कुडाळ,जि.सिंधुदुर्ग ९४२३९५०००२ |
| ९. | चैताली --- | देशस्थ | १५/११/९३ --- | गार्ग्य, वृश्चिक ज्येष्ठा, प्रथम आद्य, राक्षस | M.Tech. Compu Engg. | खाजगी नोकरी पुणे | वा.प्रा. १४ लाख | मेघ:श्याम नरहर जोशी जरग नगर, कोल्हापूर ९९६०४९५३५१ |
| १०. | पूर्वा O -ve | देशस्थ | २९/८/९२ ५.४ | गौतम, सिंह, उत्तरा, पहिले आद्य, मनुष्य | C.S. LLB | खाजगी नोकरी कोल्हापूर | मा.प्रा. १५,०००/- | हेमंत आ. गरवारे राजारामपुरी, कोल्हापूर. ८३९०७८०२७४ |

**चैत्राली विजयकुमार कुलकर्णी (देशस्थ) (विधवा)**

**जन्मतारीख :** ०७/०४/१९९१ **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** M.C.A. **नोकरी :** सरकारी नोकरी, कोल्हापूर

**मा.प्रा. :** २२,०००/- **रक्तगट :** B +ve

**पत्ता : श्री. विजयकुमार कुलकर्णी**

प्रियदर्शिनी अपार्टमेंट, अंबाई टँक, कोल्हापूर.

मो. 8308311815

**अपेक्षा :** अनुरूप, शक्यतो कोल्हापूर

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वसिष्ठ | धनु | पूर्वाषाढा | द्वितीय | मध्य | मनुष्य |

**वृषाली विनायक अष्टेकर (देशस्थ) रक्तगट :** B +ve

**जन्मतारीख :** १०/५/१९९८ **उंची :** ५.२

**शिक्षण :** एम.ए. (इंग्रजी) व एम.ए. (भरतनाट्यम् विशारद पूर्ण)

**नोकरी :** --- **वा.प्रा. :** ---

**पत्ता : श्री. विनायक शामराव अष्टेकर**

मंगळवार पेठ, महालक्ष्मी बँकेसमोर, कोल्हापूर.

मोबा. 9403576638, 9423826455

**अपेक्षा :** शक्यतो कोल्हापूर, वयातील अंतर ० ते ३ वर्षे असावे

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| जमदग्नी वत्स | तूळ | स्वाती | २ रे | अंत्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - सप्टेंबर २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयूर<br>--- | देशस्थ | १८/१/८९<br>५.४ | भारद्वाज, मेष कृतिका, अंत्य, राक्षस | B.A. MCVC Dip. | शेती | वा.प्रा. ३ लाख | श्रीमती रोहिणी चं. कुलकर्णी<br>मु.पो.कुंडल, पलुस, सांगली<br>७७७४८३५४५१ |
| २. | केदार<br>O +ve | देशस्थ | १०/१०/९०<br>५.५ | काश्यप, मिथुन आर्द्रा, दुसरे आद्य, मनुष्य | B.E. (Prod) | नोकरी कोल्हापूर येथे | वा.प्रा. ४ लाख | सतीश नारायण दंडी<br>पाचगाव रोड, कोल्हापूर<br>९३२६९३९८६९ |
| ३. | सचिन<br>B +ve | देशस्थ | ४/६/९१<br>५.६ | उपमन्यु, मकर धनिष्ठा, दुसरे मध्य, राक्षस | M.Sc. Electronics | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ४ लाख | लक्ष्मी नारायण वाघमारे<br>हनुमान नगर, कोल्हापूर<br>९६५७०३७९४१ |
| ४. | रोहन<br>B +ve | देशस्थ | ७/७/९२<br>५.९ | भारद्वाज, कन्या चित्रा, दुसरे, मध्य, राक्षस | B.Com. Computer Course | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३.५ लाख | रमेश रघुनाथ कुलकर्णी<br>मगदूम लॉन, कोल्हापूर<br>९०६७५७२१८३ |
| ५. | प्रसाद<br>--- | कोकणस्थ | १५/४/९३<br>५.८ | वसिष्ठ, कुंभ पू.भाद्र., प्रथम आद्य, मनुष्य | B.Com. Tally | कॉसमॉस को ऑप. बँक येथे | मा.प्रा. २५,०००/- | शरद विष्णूपंत मोडक<br>अहमदनगर<br>९६०४७४९८९५ |
| ६. | हिमांशू<br>O +ve | देशस्थ | १२/१२/९४<br>५.८ | वसिष्ठ, मीन, रेवती, चौथे अंत्य, देवगण | Electronic & Telecom | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. २१.५ लाख | हेमंत उपाध्ये<br>कोल्हापूर<br>९६२३२१२०४१ |
| ७. | चिन्मय<br>O +ve | कायस्थ प्रभू | १३/६/९५<br>५.९ | अगस्ती, धनु मूळ, द्वितीय आद्य, राक्षस | M.B.A. Finance | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३.५ लाख | अभय देशपांडे<br>देवकर पाणंद, कोल्हापूर<br>७८४३००३३२१ |
| ८. | हेमंत<br>B +ve | देशस्थ | १६/७/९६<br>५.१० | शौनक, कर्क पुष्य, तिसरे मध्य, देवगण | M.Com. Web Developer | कोल्हापूर येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. २.६२ लाख | प्रसाद रघुनाथ कुलकर्णी<br>मंगळवार पेठ, इचलकरंजी<br>८२०८६६३२२० |
| ९. | आदित्य<br>O +ve | देशस्थ | १६/४/९७<br>५.९ | वसिष्ठ, कर्क आश्लेषा, तिसरे अंत्य, राक्षस | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ११ लाख | कमलाकर शंकर आराध्ये<br>नागाळा पार्क, कोल्हापूर<br>८८०५५६७४७४ |
| १०. | ओंकार<br>A +ve | देशस्थ | २१/५/९८<br>५.८ | मुनिभार्गव, मीन उ.भाद्र.,पहिले मध्य, मनुष्य | B.E (Mech) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ४.६० लाख | श्रीपाद शंकर दंडगे<br>ता.हुक्केरी, जि.बेळगाव<br>९६५७८३८७९५ |

### मोरेश्वर गजानन गलगले (कोकणस्थ)

**जन्मतारीख :** २/५/१९८८ **उंची :** ५.१० **रक्तगट :** B+ ve
**शिक्षण :** B.E. Instrumentation
**नोकरी :** सांगली येथे नोकरी **वा.प्रा. :** ३.५ लाख
**पत्ता : गजानन गलगले**
गावभाग, सांगली.
मोबा. 9422288620, 9890431030
**अपेक्षा :** ---

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कौशिक | तुळ | स्वाती | ४ थे | अंत्य | देवगण |

### सर्वेश सुरेश किर्लोस्कर (कऱ्हाडे) रक्तगट : B +ve

**जन्मतारीख :** १८/१०/१९९६ **उंची :** ५.७
**शिक्षण :** B.B.A. **नोकरी/व्यवसाय :** स्वत:चे जनरल किराणा दुकान
**मा.प्रा.** : ३५ ते ४० हजार
**पत्ता : सुरेश किर्लोस्कर**
राजरामपुरी १२ वी गल्ली, कोल्हापूर.
मोबा. 9673536429, 9130919393
**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | धनु | मूळ | ४ थे | आद्य | राक्षस |

कोल्हापूर चित्पावन संघ आणि
We For Ours युवा मंच आयोजित

## दशावतारी लोकनाट्य 'राजकिरीट'





शनिवार, दि. २९ जुलै २०२३ रोजी कोल्हापूर चित्पावन संघ आणि 'We for ours' युवा मंच आयोजित दशावतार लोकनाट्य 'राजकिरीट' चे आयोजन केले होते. हे नाटक भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र, कोल्हापूर निर्मित सर्जन शाळा यांनी सादर केले. हा कार्यक्रम राम गणेश गडकरी सभागृह येथे संपन्न झाला. कार्यक्रमाला सुमारे ३५० प्रेक्षकांची उपस्थिती होती. सर्व उपस्थितांना गुलकंद बर्फीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे समाजाच्या सर्व स्तरातून भरपूर कौतुक झाले.

## अधिक मासा निमित्त 'सामुहिक दाम्पत्य भोजन' सोहळा






कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्त ३०+३ दाम्पत्य भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी हा कार्यक्रम खरे मंगल कार्यालय येथे पार पडला. या कार्यक्रमाचे यजमानपद २३ दाम्पत्यांनी घेतले होते आणि एकूण १०५ दाम्पत्ये भोजनासाठी उपस्थित होती. सर्व सुवासिनींची खणा-नारळाने व दक्षिणा देऊन ओटी भरण्यात आली. तर सर्व पुरुषांना निरांजन दक्षिणा देण्यात आली. सौ. व श्री. तुषार दिवेकर यांच्या हस्ते पूजाविधी करण्यात आला. श्री. अमोघ भागवत यांनी पौरोहित्य केले.

## भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त सामाजिक उपक्रम



दि. १५ ऑगस्ट २०२३, ७७ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त कोल्हापूर जिल्हा समस्त ब्राह्मण संघातर्फे पंचगंगा स्मशान भूमी येथे एक अभिनव सामाजिक उपक्रम साजरा केला. महानगरपालिकेचे पंचगंगा स्मशान भूमी येथे कार्यरत असलेले दोन कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना त्यांनी केलेल्या कार्याची पोचपावती म्हणून त्यांचा ब्राह्मण संघातर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे यांचेसह श्री. संजय जोशी, श्री. मकरंद करंदीकर, श्री. प्रसाद कुलकर्णी, श्री. संतोष साने, श्री. जयंत हरळीकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते निवृत्त होत असलेल्या दोन कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ आणि मानधन देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांना जिलेबी वाटप करून कार्यक्रमाची सांगता केली.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.